रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२०
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, १६ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे -देशमुख/२
आवासमध्ये नागेश्वराच्या यात्रेला भाविकांची गर्दी/५
रणजी सामन्यात अंशुल कंबोजच्या १० विकेट/८

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पावसात गाजवली सभा



**सांगली** : जिल्ह्यातील शिराळा येथे सत्यजीत देशमुख यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा शुक्रवारी (दि. १५) झाली. या वेळी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. या पावसातच त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. ते म्हणाले, सत्यजीतदादा आता तुमची सीट निवडून येणार हे पक्के झाले आहे, कारण मी आता पावसात सभा घेत आहे. पावसात सभा झाली की विजय होतोच, पण मी तुम्हाला सांगतो, पाऊस पडो या ना पडो भाजपच्या बाजूने मतांचा पाऊस पडणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. त्यांनी पुढे म्हटले, सत्यजीत यांचे वडील शिवाजीराव देशमुख यांना सभागृहात पाहायचो. ते वेगळ्या पक्षात असले तरी प्रेरणा घ्यावी असे ते व्यक्तिमत्व होते. त्यांचा प्रत्येक गुण मला सत्यजीतमध्ये दिसतो. त्यामुळे आपल्याला सुसंस्कृत व जमिनीवर काम करणारा नेता उमेदवार म्हणून मिळाला आहे.

# भाजप नियमांचे पालन करतो -ना. अमित शाह

### हेलिकॉप्टरमधील बॅग तपासणीनंतर प्रतिक्रिया





**हिंगोली : प्रतिनिधी**

भाजप निष्पक्ष निवडणुका आणि निवडणूक व्यवस्थेवर विश्वास ठेवतो आणि निवडणूक आयोगाने बनवलेल्या सर्व नियमांचे पालन करतो, अशी प्रतिक्रिया भाजपचे वरिष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली आहे.

केंद्रीय मंत्री अमित शाह शुक्रवारी (दि. १५) महायुती उमेदवारांच्या प्रचारासाठी हेलिकॉप्टरने हिंगोलीत आले असता निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅगेची तपासणी केली. या वेळी शाह यांनी आवश्यक ते सहकार्य केले. या संदर्भात त्यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून व्हिडीओ शेअर केला आहे. ‘आज महाराष्ट्राच्या हिंगोली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी माझ्या हेलिकॉप्टरची तपासणी केली. भाजप निष्पक्ष निवडणुका आणि निवडणूक व्यवस्थेवर विश्वास ठेवतो आणि माननीय निवडणूक आयोगाने बनवलेल्या सर्व नियमांचे पालन करतो. आपण सर्वांनी निष्पक्ष निवडणूक प्रणालीमध्ये योगदान दिले पाहिजे आणि भारताला जगातील सर्वात मजबूत लोकशाही कायम ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावले पाहिजे,’ असे ना. शाह यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी निवडणूक आयोगाकडून कठोर पावले उचलण्यात आली आहेत. याचाच एक भाग म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हेलिकॉप्टरमधील बॅगांची तपासणी केली होती. त्या वेळी ठाकरे यांनी संताप व्यक्त केला होता. दरम्यान, इतर पक्षांच्या नेत्यांच्याही बॅगांची निवडणूक आयोगाकडून तपासणी केली जात आहे.

# महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढता पाठिंबा

### महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा आणि खान्देश सामाजिक विकास संस्थेचे समर्थन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा तसेच खान्देश सामाजिक विकास संस्थेने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे.

खान्देश सामाजिक विकास संस्थेने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे, तर महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेने आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे पाठिंबापत्र सुपूर्द केले.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा ही तेली समाजाची राज्यस्तरीय संस्था असून मागील ४० वर्षांपासून राज्यात कार्यरत आहे. देशस्तरीय तसेच राज्यस्तरीय झालेल्या ठरावानुसार महासभेने भाजप महायुतीच्या उमेदवारांना समर्थन देण्याचे ठरवले. त्या अनुषंगाने महासभेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेने पनवेल विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा दिला असून तालुका अध्यक्ष सुनील खळदे, कार्याध्यक्ष तुकाराम किरवे, सचिव प्रवीण धोत्रे, महिला अध्यक्ष रत्नप्रभा पिंगळे, कोकण विभाग कार्याध्यक्ष गणेश धोत्रे यांनी पाठिंबापत्र दिले.

खान्देश सामाजिक विकास संस्थेनेही आपला समर्थन देत मंडळाचे सर्व पदाधिकारी व सभासद आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खंबीर पाठीशी असल्याची ग्वाही दिली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष भरत थोरात, सचिव दिलीप अहिरे, खजिनदार एस.एन. वाघ, सदस्य गणपत थोरात उपस्थित होते.



## ना. मुरलीधर मोहोळ यांचे ‘दिबां’ना अभिवादन!



**पनवेल : केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या संग्राम निवासस्थानी शुक्रवारी सदिच्छा भेट दिली आणि ‘दिबा’साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ‘दिबा’साहेबांचे पुत्र अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, श्रीनंद पटवर्धन, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, जगदीश गायकर आदी उपस्थित होते.**

## बॉयलरचा स्फोट; तीन कामगार ठार

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगरमधील शेंद्रा एमआयडीसीत शुक्रवारी (दि. १५) स्फोट झाला. येथील रेडीको एन.व्ही. कंपनीतील मका साठवून ठेवणाऱ्या बॉयलरचा स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू, तर सात ते आठ कामगार बॉयलर खाली दबले.

बॉयलरची वेल्डिंग सुरू असतानाच स्फोट झाला. यानंतर तेथे युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### वेगाची स्पर्धा करताना भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू

**डेहराडून** : उत्तराखंडची राजधानी डेहराडूनमध्ये इनोव्हा गाडी पुढे जाणाऱ्या ट्रकवर आदळून सहा जणांचा मृत्यू, तर एक गंभीर जखमी झाला आहे. मृतांमध्ये पाच तरुण व एका तरुणीचा समावेश आहे. हा अपघात शुक्रवारी (दि.१५) मध्यरात्री २च्या सुमारास झाला. इनोव्हा गाडीत बसलेले बीएमडब्लू वाहनाबरोबर वेगाची स्पर्धा करीत होते. त्यांनी मद्यपान केले होते का याचाही पोलीस तपास करीत आहेत.

### मुंबईतील बीकेसी मेट्रो स्टेशनला आग; सुदैवाने अनर्थ टळला

**मुंबई** : येथील वांद्रे कुर्ला संकुल परिसरातील मेट्रो लाईन ३वरील बीकेसी मेट्रो स्टेशनला शुक्रवारी (दि. १५) दुपारी एकच्या सुमारास आग लागली. त्यामुळे या ठिकाणाहून प्रवाशांना तत्काळ बाहेर काढण्यात आले. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. बीकेसी हे अंडरग्राउंड स्टेशन असून आगीचे नेमके कारण समजू शकले नाही, मात्र त्या ठिकाणी काम सुरू होते. वेळीच सावधगिरी बाळगल्याने मोठा अनर्थ टळला.



## पनवेल कोळीवाड्यातील शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन पनवेल कोळीवाड्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. १५) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते स्वागत करून त्यांना पक्षात प्रवेश देण्यात आला. या प्रवेशामुळे शेकापला शहरात आणखी एक झटका बसला आहे.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, विनायक मुंबईकर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, हारूशेठ कोळी, रोशन ठाकूर, पवन सोनी आदी उपस्थित होते.

या वेळी पनवेल कोळीवाडा येथील शेकापचे आकाश भगत, राहुल पाटील, केतन भोईर, राहुल शेलार, अरुण शेलार, रवी भोईर, मच्छिंद्र भोईर, अरुण भोईर, किरण भोईर, विवेक शेलार यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला.

आज कोळीवाड्यातील या प्रवेशामुळे ताकद वाढली असून तुम्हाला पक्षात मान-सन्मान दिला जाईल अशी ग्वाही शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्यासाठी प्रत्येकाने सिंहाचा वाट उचलावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# आमदार महेंद्र दळवी इतिहास घडवणार -खासदार तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग विधानसभा मतदारसंघात शेकाप सोडून इतर कोणत्याही पक्षाचा आमदार सलग दोनवेळा निवडून आलेला नाही. या वेळी ही परंपरा खंडित होणार आहे. महायुतीचे उमेदवार अलिबागचे विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठिशी आम्ही सर्व खंबीरपणे उभे आहोत. त्यामुळे ते या मतदारसंघातून सलग दोन वेळा निवडून येण्याचा इतिहास घडवतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.



अलिबाग विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि. १४) अलिबाग येथे सभा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी खासदार तटकरे बोलत होते.


या सभेस खासदार श्रीरंग बारणे, भाजप नेते जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, सहकार आघाडी कोकण सहसंयोजक गिरीष तुळपुळे, भाजप महिला आघाडीच्या शोभा जोशी, भाजप अलिबाग शहर अध्यक्ष अ‍ॅड. अंकित बंगेरा, अ‍ॅड. पल्लवी तुळपुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, हर्षल पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, हिरामण तांबे, विजय कवळे आदी पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, मागच्या ५० वर्षात अलिबाग नगर परिषदेला जितका निधी मिळाला नाही त्यापेक्षा जास्त निधी आमदार महेंद्र दळवी यांनी मिळवून दिला आहे. सांबरकुंड धरण, रेवस-करंजा पूल आदी प्रश्न दळवी यांच्यामुळे मार्गी लागले आहेत. त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्यांनी केलेल्या कामाची दखल जनतेने घेतली आहे. (पान २ वर..)

### शेकाप लुटारूंचा पक्ष -खासदार बारणे

शेकाप हा लुटारूंचा पक्ष आहे. त्यांना मतदान करू नका. सर्वसामान्यांसाठी धावून येणारे आमदार महेंद्र दळवी यांना मतदान करून त्यांना विजयी करा, असे आवाहन खासदार श्रीरंग बारणे यांनी या वेळी मतदारांना केले.

> **आमदार झाल्यापासून अलिबाग नगर परिषदेच्या विकासासाठी २०० कोटी रुपयांचा निधी पाच वर्षात आणला आहे. यात पाणीपुरवठा योजना, भूमिगत गटार योजना, मत्स्यालय यासारख्या कामांचा समावेश आहे. येणाऱ्या काळात मुरुडच्या धर्तीवर अलिबागचा विकास करायचा आहे.**
>
> **-आमदार महेंद्र दळवी, महायुतीचे उमेदवार**



**अलिबाग : त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त चौल येथील रामेश्वर मंदिराला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती.**

## मनसेचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा शुक्रवारी (दि. १५) प्रसिद्ध केला. चार भागातील या जाहीरनाम्यात विविध मुद्द्यांना स्पर्श करण्यात आला आहे.

दरम्यान, शिवाजी पार्कमधील १७ तारखेची सभा आम्ही करणार नाही, असे राज यांनी या वेळी जाहीर केले. या सभेसाठी शासनाकडून परवानगी आलेली नाही. दीड दिवसात सभा करणे कठीण होऊन बसते. त्याऐवजी मुंबई, ठाण्यातील मतदारसंघात दौरा सुरू होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांना महायुतीची भक्कम साथ अन् मतदारांकडून विजयाचा आशीर्वाद





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

महायुतीच्या कार्यकर्त्यांची साथ आणि मतदारांचा विजयाचा आशीर्वाद आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचारादरम्यान सर्वच ठिकाणी मिळत आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून कार्यकर्तेदेखील जोमाने पनवेल मतदारसंघातील मतदारांपर्यंत पोहचून जोरदार प्रचार करत आहे.

### कळंबोली, रोडपालीत जोरदार प्रचार

या अंतर्गत गुरुवारी (दि. १४) कळंबोली आणि रोडपालीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रचार करण्यात आला. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजू शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर तसेच अमर ठाकूर, यशवंत ठाकूर, अरुण पाटील, कृष्णा पाटील, सत्यम पाटील, रामा महानवर, अशोक मोटे, भास्कर पाटील, संतोष ठाकूर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

# रायगडात नवमतदारांची मते महत्त्वपूर्ण

### राजकीय पक्षांकडून सोशल मीडियातून साधला जातोय संपर्क

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात १८ ते १९ वयोगटातील ५५ हजार ८९३ नवमतदार आहेत. ते पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. या मतदारांचा कल महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात १५ हजार ५५१ नवमतदार आहेत. कर्जतमध्ये सात हजार ९७३, उरणमध्ये आठ हजार ९१०, पेणमध्ये सहा हजार ८८०, अलिबागमध्ये सहा हजार ७५५, श्रीवर्धनमध्ये चार हजार १५६, तर महाडमध्ये पाच हजार ६६८ नवमतारांनी नोंदणी केली आहे. हे मतदार पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ते उत्साहाने मतदान करतील. त्यांची मते निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष या नवमतदारांशी मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजमाध्यमांच्या माध्यमातून उमेदवार या मतदारांशी संपर्क साधत आहेत.

विधानसभा निवडणूक आता अंतिम टप्प्यात आल्याने प्रचाराचा वेग वाढला आहे. उमेदवारांसह कार्यकर्त्यांची लगबग वाढली आहे. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी गावभेटी, घरोघरी मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला आहे.

# सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे

## विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व शासकीय विभागांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून समन्वयाने काम करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, अपर पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बढे, निवासी उजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांसह विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त राजेश देशमुख मार्गदर्शन करताना म्हणाले की, निवडणुकीतील प्रत्येक दिवस महत्त्वाचा असून ही निवडणूक इतर निवडणुकीपेक्षा वेगळी आहे. निवडणूक आयोगाने आपल्याला ज्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत, त्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. मतांची टक्केवारी वाढावी यासाठी दिव्यांग मतदार, ८५ वर्षे वयावरील ज्येष्ठ नागरिक यांना आयोगाने घरून मतदान करण्याची (होम वोटिंग) सुविधा दिली आहे. दिव्यांग मतदारांचे १०० टक्के मतदान होईल या दृष्टीने नियोजन करावे. दिव्यांगांना सहजतेने मतदान करता यावे यासाठी त्यांना द्यावयाच्या सुविधा सर्व मतदान केंद्रांपर्यंत उपलब्ध करण्यात याव्यात, तसेच मतमोजणी झाल्यानंतर व्हीव्हीपॅट व ईव्हीएम मशीन स्ट्राँगरुममध्ये व्यवस्थितपणे ठेवण्याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. मतदानावेळी एखादी मशीन बंद पडल्यास ती मशीन तात्काळ दुरुस्त करण्याची कार्यवाही झाली पाहिजे याकडे विशेष लक्ष द्यावे. सर्व यंत्रणांनी लोकसभा निवडणूक-२०२४मध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने काम केल्याबद्दल विभागीय आयुक्त देशमुख यांनी सर्वांचे अभिनंदन केले. मागील निवडणुकीच्या तुलनेत या निवडणुकीतील मतदान अधिक व्हावे, या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे सर्वांनी लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

पोस्टल व होम वोटिंगद्वारे होणारे मतदान मतपत्रिकेवर होत असून या दृष्टीने यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांनी काळजीपूर्वक काम करावे. सी-व्हीजील, आचारसंहिता कक्ष, जिल्हा निवडणूक सनियंत्रण कक्ष याकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी सोडविण्यासाठी सतर्कता राखावी, अशा सूचना विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी जावळे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निवडणूक विषयक विविध समितीनिहाय कामकाजाची माहिती दिली. जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष, मतदार जागृकता व सहभागिता कार्यक्रम (स्वीप), सी व्हिजील ॲप, सक्षम ॲप, ईव्हीएम, ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदार यांचे मतदान, पोस्टल मतदान व होम वोटिंग प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सरमिसळ प्रक्रिया, सूक्ष्म निवडणूक निरीक्षक प्रशिक्षण यांसह विविध बाबींची माहिती दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त, आराखडाबाबतची माहिती दिली.

# गुरे चोरणारे सराईत गुन्हेगार पेण पोलिसांच्या ताब्यात



**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये गुरे चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांना पेण पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत.

फिर्यादी प्रकाश रामचंद्र शिंगरूत वय ६९ वर्षे (रा. आरटीओ ऑफिसच्या समोर, पेण) यांचा ५० हजार रुपये किंमतीचा बैल चोरी झाला होता. त्यांनी याबाबत पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पोकळे व गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार हे करीत होते. कौशल्यपूर्ण तपास करून गुन्हा उघडकीस आणण्यास गुन्हे प्रकटीकरण पेण शाखेला यश आले.

आरोपी शहाबाज इस्माईल शम्सी उर्फ गोरू (वय २२, रा. गोविंदवाडी, कल्याण प., जि.ठाणे), अशफी डॅनियल मदु उर्फ एचपी (वय ३०,रा. गोविंदवाडी, रेती बंदर, कल्याण प., जि.ठाणे) यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मारूती सुझुकी कंपनीची स्विफ्ट गाडी (एमएच ०२ एपी ६३६६) हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरूद्ध इतर पोलीस ठाण्यात १० ते १२ गुन्हे दाखल आहेत.

तपासात गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक समद बेग, प्रतिक पोकळे, सहाय्यक फौजदर राजेश पाटील, हवालदार संतोष जाधव, राजेंद्र भोनकर, प्रकाश कोकरे, अजिंक्य म्हात्रे, सुशांत भोईर, सचिन व्हस्कोटी, अमोल म्हात्रे, शिपाई गोविंद तलवारे, महिला पोलीस नाईक सुप्रिया शिंदे यांनी केला.

# वृत्तपत्रातील जाहिरातींना एमसीएमसीचे प्रमाणिकरण बंधनकारक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार, इतर कोणतीही संस्था, व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २० नोव्हेंबर रोजी मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवसआधी म्हणजेच १९ नोव्हेंबर रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्वप्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करू नये.

भारत निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असे आदेश राज्याचे अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी शरद दळवी यांनी दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खिळ बसेल अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत, याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत.

कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्तींनी मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच १९ नोव्हेंबर रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्वप्रमाणित केली जात नाही, तसेच राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना सदर कालावधीत प्रिंट माध्यमांमध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी एमसीएमसी समितीकडे अर्ज करावा, अशा सूचनाही निवडणूक आयोगाने दिल्या आहेत.

# नवी मुंबई काँग्रेसच्या ३०० कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश



**नवी मुंबई : बातमीदार**

नुकतेच काँग्रेसला सोडचिठ्ठी दिलेल्या व भाजपात प्रवेश केलेल्या काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक यांनी पुन्हा एकदा काँग्रेसला धक्का दिला आहे. तब्बल ३०० कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला.

राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण तसेच आमदार निरंजन डावखरे, बेलापूर विधानसभेच्या उमेदवार आमदार मंदा म्हात्रे व नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, सी.व्ही. रेडी, सतिश निकम यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.

या वेळी अनिल कौशिक यांची भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी, शार्दुल कौशिक यांची बेलापूर विधानसभा मतदारसंघात सहसमन्वयक व विक्रम शिंदे यांची भाजप नवी मुंबई जिल्हा प्रवक्तापदी नियुक्ती झाली आहे. त्याबाबत वाशी सेक्टर १५ येथील गुजरात भवन येथे अभिनंदन सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी शार्दुल कौशिक नवी मुंबई जिल्हा प्रवक्ता यांनी मंदा म्हात्रे यांना १५१ बेलापूर विधानसभे मधून एक लाख मतांनी जिंकवून आणू, असे आश्वासन या सोहळ्यामध्ये दिले. या कार्यकर्ता प्रवेश सोहळ्यामध्ये ६५० कार्यकर्त्यांचा समावेश होता.

या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी या सभेमध्ये सांगितले की, येणाऱ्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानामध्ये मंदा म्हात्रे यांसारख्या हुशार आणि कर्तृत्वान महिला आमदारांना विधानसभेमध्ये निवडून आणायचे आहे. दोन हजार कोटींहून अधिक कामे त्यांनी बेलापूर मतदारसंघात केली आहेत. अशा आमदाराला आपण सर्वांनी एक ताकतीने पुन्हा निवडून द्यावे. भाजपचे अध्यक्ष रामचंद्र घरत यांनी, आमच्या पार्टीमधून निघून जाणारे स्वतःच्या स्वार्थापोटी गेले आहेत. त्यांच्यासाठी आमच्या पक्षाचे दरवाजे पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत, आमच्या पार्टीला लाभलेले आणि नुकताच प्रवेश केलेले आमचे मित्र अनिल कौशिक यांच्या माध्यमातून नवी मुंबई भारतीय जनता पक्षाला बळ मिळाले आहे. असे म्हणत त्यांनी काँग्रेसमधून भाजपामध्ये आलेल्या ३०० कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

ॲड. अनिल कौशिक यांनी सांगितले की, मी ४० वर्षे काँग्रेस पक्षामध्ये एकनिष्ठ कार्य केले, मी रात्र-दिवस न पाहता मेहनतीने पक्षवाढीसाठी कार्य केले. काही पक्षाचे कार्यकर्ते लोकांना ब्लॅकमेल करतात, याबाबत मी वरीष्ठांच्या निदर्शनास आणूनसुद्धा त्यांनी कारवाई करण्याऐवजी त्यांना प्रोत्साहीत केले. मला चांगले कार्य करायचे आहे.

# नवी मुंबईत नागरिकांनी घेतली सामूहिक मतदार शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या स्वीप कार्यक्रमांतर्गत जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या सूचनेनुसार गुरुवारी (दि.१४) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली व बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघात मतदानाची सामूहिक शपथ घेण्यात आली.

या अंतर्गत महानगरपालिका मुख्यालयासह विभाग कार्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, महापालिकेच्या व खासगी शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण सोसायट्या तसेच विविध आस्थापना या ठिकाणी १.७५ लाखांहून अधिक नागरिक, विद्यार्थी यांनी मतदानाची सामूहिक शपथ घेतली.

मुख्यालयात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि इतर विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी ज्ञानकेंद्रात सामूहिकपणे मतदान शपथ ग्रहण केली.

अशाचप्रकारे महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयांमध्ये सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या समवेत अधिकारी, कर्मचारी यांनी शपथ ग्रहण केली. त्याचप्रमाणे महानगरपालिकेची तीन रुग्णालये, दोन माता बाल रुग्णालये व २६ नागरी आरोग्य केंद्रे याठिकाणीही शपथ घेण्यात आली.

याशिवाय घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व स्वच्छता मित्र आणि स्वच्छता सखी, स्वच्छता अधिकारी यांनीही ठिकठिकाणी मतदान शपथ घेतली. विविध उदयानांमध्ये, जलकुंभ व मलप्रक्रिया केंद्रे या ठिकाणीही मतदान शपथ घेण्यात आली.

पान १ वरुन

## आमदार महेंद्र दळवी इतिहास घडवणार -खासदार तटकरे

ते सलग दोन वेळा निवडून येण्याचा इतिहास घडवतील. त्यांचा विजय निश्चित आहे. मताधिक्य इतके मिळवायचे आहे की, पुन्हा त्यांच्यासमोर निवडणुकीत उभे राहण्याची हिंमत विरोधक करणार नाही.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत जे पंधराशे रुपये देण्यास विरोध करत होते तेच आज तीन हजार रुपये देण्याची आश्वासने देत फिरत आहेत, मात्र महाविकास आघाडीच्या फसव्या आश्वासनांना जनता भूलणार नाही. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचेच सरकार येईल, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

माझ्याविरोधात निवडणूक लढवित असलेल्या शेकाप उमेदवाराच्या घरातील चार जणांना मी राजकीयदृष्ट्या घरी बसवले आहे. आता पाचव्या व्यक्तीला घरी बसवणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात अलिबाग नगर परिषदेवरही महायुतीची सत्ता आणायची आहे, असे या वेळी आमदार महेंद्र दळवी म्हणाले. हिरामण तांबे, ॲड. महेश मोहिते, शोभा जोशी यांचीही समयोचित भाषणे झाली.

## रायगडात विशेष लोक अदालतीचे आयोजन

**रायगड** : उच्च न्यायालय, मुंबईतर्फे विधी सेवा प्राधिकरणाचे सहकार्य घेत ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या विशेष लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ए. एस. राजंदेकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी केले आहे.

न्यायालयातील तडजोडपात्र प्रलंबित प्रकरणे सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोक अदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आले आहे. लोक अदालतीच्या माध्यमातून अनेक पक्षकारांनी आपली प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढली आहेत. लोकअदालतीमध्ये तडजोडीद्वारे निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रलंबित प्रकरणातील पक्षकार यांच्या सोबतच शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे, तसेच लोक अदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश आले आहे. लोक अदालतीचे यश लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने प्रलबित असलेले तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्याकरीता विशेष लोक अदालतीचे आयोजन ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी केले आहे. प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी उपक्रम राबविण्यात येत आहे.

# माणगावात आमदार गोगावले यांच्या प्रचाराला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

विकासकामांबरोबरच लोकांच्या सुखदुःखात मदत करणारे आमदार भरत गोगावले यांना सलग चौथ्यांदा आपण सर्वांनी विजयी करा, असे आवाहन युवा सेना अधिकारी विकास गोगावले यांनी विळे येथील गाव बैठकीत केले. आमदार भरत गोगावले यांच्या प्रचारानिमित्त गुरुवारी (दि.१४) काढण्यात आलेल्या रॅलीला तसेच गावबैठकांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



विळे येथे झालेल्या गावबैठकीत विकास गोगावले म्हणाले यांनी, विरोधक या भागात गेल्या पाच वर्षांत कधीच फिरकले नाहीत. याउलट आपल्या सर्वांचे आमदार भरत गोगावले यांची आपल्या सर्वांशी नाळ जुळलेली आहे. मागच्या तीन वेळा आपण सर्वांनी ज्या पद्धतीने भरतशेठना भरभरून आशीर्वाद दिलेत त्याचप्रमाणे या वेळीही मतदानरुपी आशीर्वाद द्यावे, असे आवाहन केले. भाजप नेते बिपीन म्हामुणकर यांनी, विरोधकांनी काहीही सांगितले तरी या वेळी आमदार भरत गोगावले हे गोरगरीब जनतेच्या आशीर्वादाने ५० हजाराच्या फरकाने निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला.

या बैठकीला रायगड जिल्हा युवा सेना प्रमुख विपुल उभारे, राष्ट्रवादीचे नेते अनंता महाडिक, शिवसेनेचे सुधीर पवार, अविनाश नलावडे, मंगेश सावंत, माजी सभापती आप्पा म्हामुणकर, भाजपचे माणगाव तालुकाध्यक्ष गोविंद कासार, गणेश समेळ, वैभव मोरे, संतोष पोळेकर, निलेश वांजळे, संजय गुळंबे, निजामपूर माजी सरपंच हमजा जळगावकर, शेलार मामा आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कायकर्ते उपस्थित होते.

# अंजुमन इस्लाम कॉलेजतर्फे औषधी वनस्पती जागरूकता

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सने बालदिनाला गुरुवारी (दि.१४) शालेय विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतींची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मुरूड नगरपालिकेच्या शाळा क्र. २चे विद्यार्थी या उपक्रमात सक्रियपणे सहभागी झाले. प्रा. डॉ. स्वाती खराडे यांनी विद्यार्थ्यांना विविध औषधी वनस्पतींबद्दल माहिती दिली. प्रा. निदा गोरमे यांनी रसायन शास्त्र आणि संगणकशास्त्र यांची महत्त्वपूर्ण ओळख करून दिली.

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आला. हा कार्यक्रमासाठी डॉ. फिरोज शेख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, अर्मान डखनी, सर्वे देवेश, बाणकोटकर शैझाद, दमाद जहीर, मुझावर उनाइस, मुख्याध्यापक दिनेश भोईर यांचे सहकार्य लाभले.



## निवडक

### मानसिक आरोग्याबाबत जनजागृती



**पनवेल** : सुप्रिम एंजल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. काळानुसार वाढत चाललेल्या सामाजिक आणि आर्थिक बदलाचे परिणाम शैक्षणिक क्षेत्रातही दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाची पद्धत सोपी व्हावी म्हणून सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात आहे, परंतु या सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे अनेक विद्यार्थी मानसिक त्रासाला बळी पडले आहेत. हे सर्व लक्षात घेऊन सुप्रिम एंजल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष गणेश ढेकणे हे मेंटल हेल्थ आणि सायकॉलिजीकल काऊंन्सलिंग करीत आहेत.

### आमिष दाखवून सहा लाखांची फसवणूक

**पनवेल** : मला रोख रक्कम दिली तर त्या बदल्यात दुप्पटीने रोख रक्कम देईन, असे सांगून एका व्यक्तीची सहा लाखांची फसवणूक दोघा जणांनी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नवीन पनवेल येथे राहणाऱ्या फिर्यादीची दोन आरोपींपैकी एकाशी मैत्री होती. त्याने माझ्या मित्राला रोख रक्कम दिलीस तर तो दुप्पटीने रोख रक्कम देईल, असे त्याला सांगितल्याने त्याच्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने त्यांच्याजवळील सहा लाख रुपये आरोपीला दिले. त्या बदल्यात आरोपीने तीन नोटांचे बंडल फिर्यादीकडे दिले. त्यामध्ये ५००रु. च्या काही खऱ्या नोटा व आतमध्ये खोट्या नोटा ठेवण्यात आल्या होत्या. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादींनी याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली.

# उरण-करंजा रस्त्याचे काम प्रगतिपथावर

### नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण



**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील चाणजे ग्रुप ग्रामपंचायत आणि करंजा मच्छिमार बंदराला जोडणाऱ्या उरण ते करंजा रस्त्याची दूरवस्था झाली होती. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणारे नागरिक व व्यवसायिक त्रस्त झाले होते. याची दखल घेत या रस्त्याच्या दुरुस्ती आणि रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून ते लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे.

उरण शहर तर करंजा हा चार किमीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून उरण ते अलिबाग हा जलमार्ग आहे. करंजा मच्छिमार बंदरात दररोज अनेक वाहने वाहतूक करीत आहेत, मात्र मार्गाच्या मधोमध रस्ता खोदण्यात आला आहे, तर अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला खडी टाकल्याने वाहने त्यात फसून अपघात होण्याची शक्यता वाढली होती. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रस्त्याच्या दुरुस्ती व रूंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी, उरण ते करंजा हा मार्ग रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे, मात्र त्याच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देण्यात आले आहे. चार किलोमीटर लांबीच्या या मार्गाच्या रुंदीकरण आणि दुरुस्तीसाठी चार कोटींचा निधी मंजूर झाला असून त्याचे काम सुरू असल्याची माहिती दिली आहे.

# गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष, सचिव यांची आज पनवेलमध्ये बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीमधील गृहनिर्माण वसाहतींच्या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष तसेच सचिवांची बैठक शनिवारी (दि.१६) वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सभा आयोजित केली आहे. या सभेला गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष तसेच सचिव यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये गृहनिर्माण वसाहतींच्या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्विप अभियानांतर्गत मतदान जनजागृती करण्याबाबत निवडणूक विभागातून सूचना आहेत.

यानुसार पनवेल विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय आधिकारी पवन चांडक तसेच पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त माध्यमातून १८८ पनवेल विधानसभा मतदार अंतर्गत सर्व गृहनिर्माण वसाहतींच्या अध्यक्ष तसेच सचिव यांची जनजागृतीपर बैठक घेण्यात येणार आहे.

# खारघर पोलिसांकडून तीन लाख ९८ हजारांची रोकड जप्त



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा निवडणूक विभागांतर्गत पोलीस पथकांतर्गत खारघर हद्दीत गस्तीवर असताना कोपरा गाव येथे पोलिसांनी तीन लाख ९८ हजारांची रोख रक्कम जप्त केली आहे.

सोमोश्वर रेसिडेन्सी सेक्टर १० खारघर या इमारतीच्या खाली रिक्षामध्ये दोन माणसे पैशांची देवाण-घेवाण करताना संशयास्पद वाटल्याने त्यांची चौकशी खारघर पोलिसांनी केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरांना मिळाल्याने त्यांच्याकडील बॅगची तपासणी केली असता त्या बॅगेमध्ये तीन लाख ९८ हजार रुपयांची रोख रक्कम आढळली.

ही रक्कम व संबंधितांना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी भरारी पथक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

# निवडणूक तोंडावर आली तरी 'मविआ'चे नेते गोंधळात

### पनवेलमध्ये उमेदवारांबाबत मतदारांतही संभ्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीला आता अवघे पाच दिवस राहिले असून सर्व उमेदवारांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. असे असले तरीदेखील महाविकास आघाडीतील अनेक नेते व उमेदवारांमध्ये प्रचार करताना गोंधळाचे वातावरण आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे नेमका उमेदवार कोण? असा प्रश्न मतदारांना पडल्याने मतदार गोंधळात आहेत, परंतु सामान्य मतदारांप्रमाणे या मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी येणाऱ्या नेतेमंडळींचासुद्धा गोंधळ उडाल्याचे चित्र आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांची गुरुवारी (दि.१४) शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचारासाठी कामोठे येथे सभा होती. या सभेस खासदार लंके आले नाहीत, तर त्यांनी मोबाईलवरून संबोधित केले, परंतु काही वेळाने खासदार लंके यांनी पनवेलच्या ठाकरे गटाच्या लीना गरड यांनासुद्धा शुभेच्छा दिल्याची छायाचित्रे पनवेलच्या मतदारांपर्यंत मोबाईलवरून पोहचली. महाविकास आघाडीतील दोन उमेदवारांचे राजकारण एकाच दिवशी खासदार लंकेंभोवती फिरत असल्याचे दिसल्याने नेतेमंडळींमध्येही गोंधळ कायम असल्याचे चित्र दिसले.

शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचारासाठी कामोठे येथे खासदार निलेश लंके हे येणार होते, मात्र त्यांनी वेळेअभावी येणे शक्य नसल्याने सभेकडे पाठ फिरवली आणि मोबाईल फोनवरून बोलले. त्यानंतर काही वेळात महाविकास आघाडीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या लीना गरड यांच्या समर्थकांनी खासदार निलेश लंके यांनी गरड यांची स्वतः भेट घेऊन त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्याची छायाचित्रे पनवलेच्या मतदारांच्या मोबाईलवर गरड यांच्या समर्थकांकडून पसरविण्यात आली.

अवघ्या पाच दिवसांवर विधानसभा निवडणूक आली आहे. महाविकास आघाडीतील शेकाप आणि ठाकरे सेनेचे उमेदवार एकमेकांसमोर उभे असल्याने या मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाविकास आघाडीतील गोंधळ कमी होण्यापेक्षा निवडणुकीची वेळ जवळ येत असताना गोंधळ अधिक वाढत चालला आहे.





**पनवेल : सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील आणि बारापाडा बूथ अध्यक्ष उमेश पाटील उपस्थित होते.**

# भानूबेन शहा विद्यालयात बाल दिन उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

बालदिनाचे औचित्य साधून तालुका विधी सेवा समिती, पनवेल आणि वकील संघटना, पनवेल यांच्या माध्यमातून पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा न्यायाधीश ४ एस. आर. चव्हाण, तिसरे पनवेल सहदिवाणी न्यायाधीश एम. डी. सैंदाणे उपस्थित होते.



न्यायाधीश चव्हाण यांनी, विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने राष्ट्राची संपत्ती असतात. विद्यार्थीदशेत मुले ही अनुकरण लवकर करत असतात. त्यांनी जास्तीत जास्त चांगल्या गोष्टींचे अनुकरण केले पाहिजे जेणेकरून उत्तुंग भरारी भविष्यात ते घेऊ शकतील, असे मनोगत व्यक्त केले.

लीगल अँड पॅनल अॅड. इंद्रजीत भोसले यांनी, प्रतिकूल परिस्थिती ही माणसाच्या यशस्वी होण्याच्या मार्गातला अडथळा होऊ शकत नाही कारण यशस्वी होणाऱ्या माणसांना संघर्ष हा करावाच लागतो. त्यामुळे आपण अतिशय दुर्गम भागातून, खेड्यापाड्यातून आलो आहोत, आपल्या मनात न्यूनगंडाची भावना न ठेवता आपण सर्वोत्तम प्रयत्न केले पाहिजेत, असे मनोगत व्यक्त केले.

विद्यालयाचा एकंदरीतच प्रवास शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटील यांनी उलगडून सांगितला. कार्यक्रमात पनवेल वकील संघटनेचे खजिनदार अॅड. धनराज तोकडे, सदस्य अॅड. भूषण म्हात्रे, अॅड. नीलम ठाकूर, अॅड. नागेश हिरवे, रिटेनर लॉयर अॅड. सुयश कामेरकर आणि कनिष्ठ लिपिक अविनाश चंदणे आदी उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयामध्ये मुस्लिम बांधवांचाही वाटा असेल -सय्यद अकबर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर हे सलग चौथ्या विजयासाठी सज्ज झालेले आहेत. समाजातील प्रत्येक स्तरांतून त्यांना पाठिंबा प्राप्त होत आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांनी मॅन टू मॅन प्रचारावर भर दिला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयामध्ये मुस्लिम बांधवांचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास त्यांनी प्रकट केला.



सय्यद अकबर यांनी नुकताच नवनाथ नगर वसाहत आणि आदई गावातील मुस्लिम वसाहतीत घरोघरी जाऊन आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रचार केला. मुस्लिम बांधवांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड पाठिंबा मिळत असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधीला सांगितले. भाजप हा आपला मित्र आहे. धर्मांधतेची झालर लावून आपल्याला दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जाईल, परंतु आपण मात्र सबका साथ सबका विकास हा मूलमंत्र जपणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचे आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करायचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

पनवेल नवनाथ नगर वसाहतीमध्ये जरीना शेख, असमा शेख, नाहिद शेख, हिना शेख, आर्शिन शेख, कवसर शेख, फातिमा शेख, फातिमा अन्सारी या हिरीरीने सहभागी झाल्या होत्या. त्यांच्यासह नेवाळी आदईचे शक्तिकेंद्र प्रमुख निलेश बाळाराम पाटील, कैलास पाटील, जरारअली खान, अमीर शेख सहभागी झाले होते.











**पनवेल : शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक यांच्या जयंतीनिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल, खारघर, कळंबोली, गुरुद्वारामध्ये अभिवादन केले तसेच शीख बांधवाना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, बबन मुकादम, अमर पाटील, राजेंद्र शर्मा, गुरूनाथ गायकर, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग आदींसह शीख बांधव उपस्थित होते.**

## संपादकीय

# प्रचारात काँग्रेस निष्प्रभ

राज्यात आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रचाराचे शेवटचे काही दिवस उरल्यामुळे आपापली भूमिका आक्रमकतेने मांडण्याचा प्रयत्न सर्वच नेतेमंडळी करीत असल्यामुळे काही प्रमाणात नेत्यांमधील मतमतांतरेही समोर येत आहेत. प्रचाराचा रंग असा उत्तरोत्तर चढत चाललेला असताना काँग्रेस पक्ष मात्र प्रचारात मागे पडल्याचे स्पष्ट दिसते आहे. लोकसभा निवडणुकीत अपघाताने हाती लागलेल्या अल्प यशानंतर काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात पुन्हा एकदा निष्प्रभ झालेला दिसतो आहे.

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेने या निवडणुकीच्या प्रचारात चांगलेच लक्ष वेधून घेतल्याचे सुरूवातीपासूनच दिसत आले आहे. ही घोषणा महायुतीच्या नेते-कार्यकर्त्यांनी उचलून धरल्यानंतर पाठोपाठच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तोच संदेश अधिक सकारात्मक पद्धतीने देणारा नवा नारा दिला. 'एक है तो सेफ है' हा तो नवा नारा. या दोन्ही नाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील जनतेला यंदाच्या निवडणुकीत आपण राज्याच्या विकासासाठी एकजुटीने महायुतीलाच मतदान केले पाहिजे हा सुयोग्य संदेश मिळतो आहे. विरोधकांच्या महाविकास आघाडीच्या कुठल्याही फेक नरेटिव्हने विचलित न होता एक समाज म्हणून एकसंध राहून सगळ्यांनी मतदान करायचे आहे असा संदेश देणाऱ्या या दोन्ही घोषणा त्यामुळेच बहुचर्चित ठरल्या आहेत. मात्र यापैकी 'बटेंगे तो कटेंगे' ही घोषणा आपल्याला पसंत नसल्याचे वेगळे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केल्याने माध्यमांनी त्यास प्रसिद्धी दिली. योगीजींची ही घोषणा उत्तर प्रदेशात चालत असेल, पण महाराष्ट्रात ती पसंत पडणार नाही, असे मत अजितदादांनी व्यक्त केले, परंतु उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी स्पष्ट शब्दांत या विषयी मतप्रदर्शन करीत 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेचे समर्थन केले. अजित पवार अनेक दशके हिंदुत्वाला विरोध करणाऱ्यांसोबत राहिले आहेत. त्या लोकांसाठी हिंदुत्वाला विरोध हीच धर्मनिरपेक्षता आहे. अशा लोकांसोबत राहिल्यामुळे अजितदादांना जनतेचा मूड समजायला थोडा वेळ लागेल. ते एक तर जनतेची भावना ओळखू शकलेले नाहीत अथवा या घोषणेचा अर्थ समजू शकलेले नाहीत. कदाचित त्यांना काही वेगळे सांगायचेही असू शकेल, असे मत फडणवीस यांनी या संदर्भात व्यक्त केले आहे. वास्तविक काही महिन्यांपूर्वी बांगला देशातील हिंदूंवरील अत्याचारांसंदर्भात बोलताना योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' असे विधान केले होते. हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत हिंदू समाजाला एकवटण्यात या विधानाने मोठे प्रभावी काम केले. लोकसभा निवडणुकांदरम्यान काँग्रेसच्या राहुल गांधी यांनी जोर दिलेले 'संविधान बचाव'चे फेक नरेटिव्ह त्यामुळे हरियाणात टिकाव धरू शकले नाही. 'बटेंगे तो कटेंगे'चा उच्चार महाराष्ट्रात होताच काँग्रेस पक्षाचा 'संविधान बचाव'चा बोगस नारा कुठच्या कुठे विरून गेला. त्यातच नागपूरमध्ये राहुल गांधी संविधानाच्या नावाखाली कोऱ्या वह्या वाटत असल्याचे समोर आल्यावर तर काँग्रेस पक्षाची बोलतीच बंद झाली. काँग्रेस पक्ष लोकांना जातीपातीत विभागण्याचा प्रयत्न करत आहे. मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी काँग्रेस पक्ष दलित, आदिवासी आणि ओबीसींचे आरक्षण हिसकावून घेणार असल्याचा घणाघाती हल्ला थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चढवल्याने 'बटेंगे तो कटेंगे'चा संदेश आणखी सुस्पष्ट झाला. एकंदरच भाजप नेत्यांच्या आक्रमक प्रचारासमोर राज्यात काँग्रेस पक्ष गर्भगळीत झाल्याचे आतापासूनच स्पष्ट दिसू लागले आहे.**

# श्रीवर्धनमध्ये सुज्ञ मतदार विकासालाच साथ देतील!





**खबरबात**
**संतोष चौकर**

श्रीवर्धन मतदारसंघातील पॅटर्नला १८ वर्षे होऊन गेली आहेत आणि त्या वेळच्या मतदारसंघाची रचनादेखील बदलली आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांचाच विजय होणार, असे चित्र या ठिकाणी दिसून येत आहे.

अगदी सुरुवातीपासूनचा इतिहास पाहिला तर बॅ. ए.आर. अंतुले, रवींद्र राऊत यांच्या वेळेला श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला होता. त्यानंतर १९९५ साली शिवसेनेचे श्याम सावंत या ठिकाणी विजयी झाले. त्यानंतर सलग २००४ सालापर्यंत या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार विजयी होत होता, परंतु त्या वेळी नारायण राणे काँग्रेसमध्ये गेल्यामुळे त्यांच्याबरोबर असलेल्या आमदारांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला होता. तेव्हा तळकोकणापासून ते संगमेश्वर मतदारसंघापर्यंत राजीनामा दिलेले सर्व आमदार काँग्रेसच्या तिकिटावर विजयी झाले होते. फक्त श्रीवर्धन मतदारसंघात पोटनिवडणूक लागल्यानंतर श्याम सावंत यांना पराभव पत्करावा लागला होता.

पूर्वी मुरूड, म्हसळा, श्रीवर्धन या जुने संस्थान असलेल्या तीन तालुक्यांचा मतदारसंघ अस्तित्वात होता. या मतदारसंघांमध्ये १,७४,४७९ मतदार होते. त्या वेळेच्या पोटनिवडणुकीत ६७.८७% मतदान झाले होते. म्हणजेच उभ्या असलेल्या उमेदवारांना १,१८,३२३ मते पडली होती, तर उर्वरित मते बाद झाली होती. या निवडणुकीत एकसंघ असलेल्या शिवसेनेचे उमेदवार तुकाराम सुर्वे यांना ६१,९९५ मते, तर काँग्रेसचे उमेदवार श्याम सावंत यांना ४६,२४० मते पडली होती.

त्या वेळी अली कौचाली यांनीदेखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांना १०,०७५ मते मिळाली. या लढतीत सुर्वे १५,७५५ मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर २००९च्या सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीअगोदर मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यामुळे रोहा माणगाव मतदारसंघ रद्द करण्यात आला. नव्याने तयार झालेल्या श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये श्रीवर्धन, म्हसळा, तळा हे तीन तालुके पूर्ण, तर रोहा शहर व रोह्याचे एक मंडळ, तर माणगावमधील एक मंडळ समाविष्ट करण्यात आले.

२००९च्या निवडणुकीतदेखील सुनील तटकरे यांच्यासमोर तुकाराम सुर्वे हे उमेदवार उभे होते, परंतु त्या वेळी सुर्वे यांचा सरळ सरळ पराभव करीत तटकरे विजयी झाले होते. त्यानंतर २०१४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शिवसेनेचे रवी मुंडे यांचा केवळ ७७ मतांनी निसटता पराभव झाला होता, तर सुनील तटकरे यांचे पुतणे अवधूत तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून विजयी झाले होते. पुढे २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी आताच्या विद्यमान आमदार आदिती सुनील तटकरे यांनी विनोद घोसाळकर यांचा जवळजवळ चाळीस हजार मतांनी पराभव केला होता.

श्रीवर्धन मतदारसंघातील काही लोकांचा समज झाला आहे की, एका ठराविक समाजाचा उमेदवार उभा केला की तो विजयी होईल, पण आता जनता सुज्ञ झालेली आहे. समाज बघून कोणीही मतदान करत नाही. या ठिकाणच्या जनतेला विकास हवा आहे, रोजगार हवा आहे. त्याचबरोबर पर्यटनवाढीसाठी विविध उपक्रम हवे आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील अनेक संघटनांनीदेखील आदिती तटकरे याच निवडून याव्यात असे म्हटले आहे, कारण अनिल नवगणे निवडून आल्यास त्याचा फायदा श्रीवर्धन मतदारसंघाला कोणत्याही प्रकारे होणार नाही.

या अगोदर २००६ सालच्या पोटनिवडणुकीमध्ये तुकाराम सुर्वे यांचा विजयदेखील श्रीवर्धन तालुक्यातील संघटनांनी केलेल्या प्रचारामुळेच झाला होता. केवळ समाजाची मते त्यांना मिळाली नव्हती. सुर्वे यांच्या विजयाचा पॅटर्न व सध्याची बदललेली राजकीय परिस्थिती याच्यामध्ये खूप फरक झालेला आहे. त्यामुळे कोणीही त्या वेळच्या पॅटर्नच्या बाता मारून विनाकारण हवेत उडू नये, कारण या ठिकाणची जनता ही विकासालाच मत देणार असून जातीयवादाला या ठिकाणी पूर्णपणे चिरडले जाईल अशी भावना अनेक सुज्ञ मतदारांनी व्यक्त केली आहे.

# श्रेष्ठ विचारवंत निर्मलकुमार फडकुले

निर्मलकुमार जिनदास फडकुले हे विचारवंत, शैलीदार वक्ते, ललितलेखक आणि समीक्षक. निर्मलकुमार फडकुले यांना वाणी आणि लेखणीचा वारसा घरातूनच मिळाला होता. वडील पंडित जिनदासशास्त्री फडकुले हे संस्कृततज्ज्ञ होते.

निर्मलकुमार फडकुले यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२८ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सोलापुरातील जैन पाठशाळेत झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी मॉडेल इंग्लिश स्कूल व हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर येथे घेतले. त्यांच्यावर शालेय वयातच संस्कृतच्या अध्ययनाचे, साहित्याचे आणि वक्तृत्व गुणांचे संस्कार झाले. त्यांच्या वडिलांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्यातील वक्ता आणि साहित्याचा अभ्यासक घडला.



पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयातून ते बीए झाले आणि सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातून त्यांनी एमएचे शिक्षण घेतले. १९७० मध्ये त्यांनी पीएचडी पदवी संपादन केली.

फडकुले यांनी १९५६ पासून सोलापुरातील संगमेश्वर महाविद्यालयात मराठी भाषा आणि साहित्याचे अध्यापनकार्य केले. विभागप्रमुखपदाची जबाबदारीही सांभाळली. प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना आणि निवृत्तीनंतरही त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात तसेच गोमंतक, बंगळूरू, धारवाड, कारवार, इंदूर, जयपूर, मीरत, बडोदे, दिल्ली, कोलकाता येथील उल्लेखनीय अशा व्यासपीठांवरून आपले विचार मांडले. केवळ मराठीतूनच नव्हे तर हिंदी भाषेतूनही त्यांनी अनेक व्याख्याने दिली. फडकुले हे शैलीदार वक्ते म्हणून प्रसिद्ध होते, त्याप्रमाणेच एक ललितलेखक आणि समीक्षक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. त्यांची २८ स्वतंत्र पुस्तके तर ११ संपादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत. उपहासगर्भ, मिश्कील तरीही मन आणि बुद्धीला आवाहन करणारे ललितलेखन त्यांनी प्राचुर्याने केले. त्यात हिरव्या वाटा(१९८६), काही रंग काही रेषा (१९८६), आनंदाची डहाळी (१९८८), रंग एकेकाचे (१९९३), जगायचं कशासाठी?, अमृतकण कोवळे (१९९५), प्रिय आणि अप्रिय (१९९८), चिंतनाच्या वाटा (२०००), मन पाखरू पाखरू (२००१), दीपमाळ(२००५), अजून जग जिवंत आहे!(२००५), काटे आणि फुले (२००७) यांचा समावेश आहे.

ग्रंथांप्रमाणेच ललितलेख संग्रहांतूनही प्रबोधनाच्या पाऊलखुणा त्यांनी अधिक सुस्पष्ट केल्या. विविध पुस्तकांतून संतांच्या जीवनविचारांवर आणि त्यांच्या काव्यावर भाष्य केले. महाराष्ट्र राज्य पुरस्कार, स्वामी विवेकानंद पुरस्कार, प्रज्ञावंत पुरस्कार, यशवंतराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार, असे अनेक सन्मान त्यांना लाभले. अशा या श्रेष्ठ विचारवंताचे २८ जुलै २००६ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# सेल्फीच्या नादात बँक खाते होऊ शकते रिकामे

सायबर फ्रॉडची रोज नवीन प्रकरणं समोर येत आहेत. लोकांची आयुष्यभराची कमाईही लुटली जात आहे.



सायबर गुन्हेगार नवनवीन डावपेच अवलंबत आहेत. आजकाल सेल्फी काढणं हे सामान्य झालं आहे. प्रत्येकाला आपले सुंदर फोटो सोशल मीडियावर शेअर करायचे असतात. पण तुमची ही सवय तुम्हाला मोठ्या संकटात टाकू शकते हे तुम्हाला माहीत आहे का? सायबर गुन्हेगार आता सेल्फीचा वापर करून तुमची पर्सनल आणि बँक अकाऊंटची माहिती चोरू शकतात. यानंतर सायबर अटॅक करून तुमचं बँक अकाऊंट रिकामं केलं जाऊ शकतं.


अनेक ॲप्स आणि वेबसाइट्सवर तुम्हाला तुमच्या ओळखीची पुष्टी करण्यासाठी सेल्फी घेण्यास सांगितलं जातं. याला सेल्फी ऑथेंटिकेशन म्हणतात. हे एक तंत्रज्ञान आहे जे हे सुनिश्चित करतं की, तुम्ही तीच व्यक्ती आहात ज्याची ओळख तुम्हाला सिद्ध करायची आहे. बहुतेक बँका आणि फिनटेक कंपन्या सेल्फीद्वारे लोकांचं व्हेरिफिकेशन करतात, मात्र याच तंत्राचा वापर सायबर गुन्हेगारही करू शकतात, ज्याद्वारे ते तुमचा गैरफायदा घेऊ शकतात.

बँक फ्रॉड : सायबर गुन्हेगार तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या बँक अकाऊंटमध्ये प्रवेश करू शकतात आणि तुमचे पैसे काढू शकतात. लोन फ्रॉड : हॅकर्स तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या नकळत तुमच्या नावावर कर्ज घेऊ शकतात. सिमकार्डचं क्लोनिंग : तुमच्या सेल्फीच्या मदतीने सायबर गुन्हेगार तुमचं सिमकार्ड क्लोन करू शकतात, ज्यावरून ते तुमच्या मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपी मिळवू शकतात.

असं ठेवा स्वतःला सुरक्षित

अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. कोणत्याही संशयास्पद लिंक्सपासून लांब राहा. तुमच्या सर्व अकाऊंटसाठी यूनिक आणि स्ट्राँग पासवर्ड तयार करा. सुरक्षा वाढवण्यासाठी टू फॅक्टर ऑथेंटिफिकेशनचा वापर करा. चांगल्या अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर करून तुमचा फोन मालवेअरपासून सुरक्षित ठेवा. सोशल मीडियावर तुमची पर्सनल माहिती शेअर करणं टाळा. तुम्ही सायबर फ्रॉडला बळी पडल्याचं तुम्हाला वाटत असल्यास, ताबडतोब तुमच्या बँकेशी संपर्क साधा. नेहमी सावध राहा आणि तुमची पर्सनल माहिती कधीही, कोणाशीही शेअर करू नका.

# दिग्गज कलावंत डॉ. श्रीराम लागू



**निमित्त**

आज डॉ. श्रीराम लागू यांचा जन्मदिवस. डॉ. लागू यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२७ साली महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामध्ये झाला. इएनटी सर्जन म्हणून त्यांच्या वैद्यकीय कारकीर्दीची सुरुवात झाली होती, परंतु एक अभिनेता म्हणून मराठी रंगभूमीवरील आणि हिंदी-मराठी सिनेमाजगतातील त्यांच्या कर्तृत्वाचा पसारा प्रचंड आहे.

डॉ. श्रीराम लागू पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये शिकत होते. या शाळेमध्ये नाटकावर विशेष लक्ष दिले जाई. डॉक्टरांबद्दल असे म्हटले जाते की, लहानपणीच ते अनेकांची नक्कल करायचे. हे पाहून त्यांच्या अवतीभवतीची बरीचशी मंडळी त्याच्या आई-बाबांना हा एक दिवस खूप चांगला अभिनेता होईल असे म्हणत असत. डॉक्टरांबद्दल एक असाही किस्सा सांगितला जातो की, त्यांना एकदा त्यांच्या शिक्षकांनी तुला नाटकात काम करायचे आहे असे सांगितले. लागूनींही जोरदार तयारी केली, मात्र प्रत्यक्ष जेव्हा रंगमंचावर उतरले तेव्हा ते प्रचंड घाबरले होते, पण त्याही परिस्थितीत त्यांनी सादरीकरण केले. त्यांच्या अभिनयाची प्रशंसाच झाली. लागूंबाबत असेही म्हटले जाते की, त्यांना स्वतःचेच नव्हे तर आपल्या सोबतच्या सहकलाकारांचेही संवाद तोंडपाठ असायचे.

डॉ. लागू मुळातच त्यांच्या अभ्यासात खूप हुशार होते. असे असूनही त्यांचे अभिनयाचे वेड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. मेडिकल कॉलेजला गेल्यानंतरही त्यांनी अभिनयाची साथ सोडली नाही. महाविद्यालयीन कालखंडातही डॉक्टरांनी दहा एकांकीका आणि पाच नाटकांमध्ये काम केले होते. डॉक्टरांची इच्छा तर अभिनय क्षेत्राकडे वळण्याची होती, परंतु त्यांच्या आई-वडिलांना त्यांनी डॉक्टर व्हावे असे वाटत होते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर डॉक्टरांनी काही काळ मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये डॉक्टरकीची प्रॅक्टिस केली.

डॉक्टरांवर लहानपणापासूनच मराठी नाटकांचा प्रभाव होता. त्यावेळचे नामवंत अभिनेते नानासाहेब फाटक, केशवराव दाते, मामा पेंडसे आणि मास्टर दीनानाथ आदींच्या अभिनयाचा डॉक्टर लागूंवर प्रचंड प्रभाव होता. त्याच दरम्यान काही अभिनेत्यांकडूनही ते प्रेरित झाले होते. नाटक आणि अनेक रंगकर्मी सतत डॉक्टरांच्या डोक्यात फिरत होते. दुर्दैवाने त्याच दरम्यान तीन वर्षांसाठी वैद्यकीय व्यवसायानिमित्त डॉक्टर लागूंना आफ्रिकेला जावे लागले. नियतीच्या या फेऱ्यांमध्ये डॉक्टरांना असं वाटलं की, त्यांचे सर्व जीवनच स्तब्ध झाले आहे, परंतु लवकरच ती वेळ आली जेव्हा आफ्रिकेतून परतता क्षणीच डॉक्टर लागूंनी त्यांच्या वैद्यकीय क्षेत्राला पूर्णविराम दिला आणि नेहमीसाठी अभिनयाची कास धरली.

डॉ. लागूंच्या अभिनय कारकीर्दीची सुरुवात १९६९ साली वसंत कानेटकर यांच्या 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकाने झाली. डॉ. लागूंना रंगभूमीवर येताच यश मिळाले असे झाले नाही. सुरुवातीची त्यांची काही नाटके खूप चालली असेही म्हणता येणार नाही, मात्र दुसऱ्या वर्षी पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'नटसम्राट' हे नाटक रंगभूमीवर आले आणि डॉक्टर लागूंना त्यातील 'अप्पासाहेब बेलवलकर' या पात्राने एक नवी ओळख मिळवून दिली. रसिक प्रेक्षकांनी हे नाटक डोक्यावर घेतलं. रंगभूमीला डॉक्टर लागूंच्या रूपात खरा 'नटसम्राट' लाभला! मराठी रंगमंचावर विजय तेंडुलकर तसेच अरविंद देशपांडे यांसारख्या अभ्यासू व्यक्तिमत्वांसोबत काम करून डॉक्टर लागूंनी मराठी रंगभूमीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

१९७२ साली डॉ. लागूंना प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' या मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. यातील डॉ. लागूंची 'मास्तर' ही व्यक्तिरेखा खूप गाजली. त्यांच्या त्यांच्या कार्यकाळात अनेक पुरस्कार लाभले. ते जसे अभिनेता होते तसेच त्यांच्यात एक लेखकही वसला होता. त्यांनी स्वतःचे जे आत्मचरित्र लिहिले आहे 'लमाण' त्यातून हे सिद्ध होते. अशा या कलावंताचा १७ डिसेंबर २०१९ रोजी पुण्यात मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




माणगाव : जि.प. केंद्रशाळा मोर्बा येथे बाल दिन उत्साहात साजरा झाला. (छाया : सलीम शेख)

## आरोग्य प्रहर

# गरोदरपणाची 'ही' लक्षणं फार लोकांना माहीत नाही

आई होणं हे कुठल्याही महिलेसाठी सर्वात सुंदर भावना आहे. प्रत्येक स्त्रीसाठी गरोदर राहणे ही भाग्याची बाब



समजली जाते. जर एखादी स्त्री पहिल्यांदाच गरोदर होत असेल तर तिला त्याबद्दल फारशी माहिती नसते. या रिपोर्टच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला सांगत आहोत अशा लक्षणांबद्दल, ज्याच्या माध्यमातून तुम्ही गरोदर आहात की नाही हे जाणून घेणं सहज शक्य होऊ शकते...

गर्भधारणेच्या सुरुवातीच्या दिवसांना अर्ली प्रेग्नंसी म्हणतात. सोप्या भाषेत गर्भधारणेच्या पहिल्या १२ आठवड्यांना अर्ली प्रेग्नंसी म्हणतात. या काळात गर्भाचा विकास झपाट्याने होतो. याशिवाय शरीरात अनेक प्रकारचे बदलही होतात. पहिल्या आठवड्यात दिसलेली काही न ऐकलेली चिन्हे जाणून घेऊया.

प्रत्येक स्त्रीचा गरोदर राहण्याचा अनुभव वेगळा असतो, कारण ही भावना प्रत्येकापेक्षा वेगळी असते. बहुतेकदा स्त्रिया असा अंदाज लावतात की त्यांची मासिक पाळी चुकल्यानंतर ती गर्भवती आहेत. स्त्रीरोग तज्ज्ञांच्या मते, काही अशी लक्षणं आहेत, जी गर्भधारणेची भिन्न, परंतु सामान्य लक्षणे आहेत.

प्रत्येक वेळेस रक्तस्त्राव म्हणजे मासिक पाळी नसते. वास्तविक, जेव्हा एखादी स्त्री गरोदर असते तेव्हा तिला सुरुवातीच्या दिवसांत हलका गुलाबी रक्तस्त्राव होतो. हे तुमच्या मासिक पाळीच्या रक्तापेक्षा बरेच वेगळे आहे. यामध्ये पीरियडप्रमाणे रक्तस्त्राव होत नाही, फक्त हलके रक्त दिसते.

हार्मोनल असंतुलनामुळे योनीच्या सभोवतालचा थर जाड होतो, ज्यामुळे योनीच्या पेशी खूप वेगाने वाढू लागतात. या कारणामुळे स्त्रीला योनीतून स्त्राव होतो. मासिक पाळी चुकल्यानंतर वारंवार लघवी करणे हेदेखील तुम्ही गर्भवती असल्याचे लक्षण आहे. यामध्ये मासिक पाळीच्या अनुपस्थितीमुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते. त्यामुळे लघवीचे प्रमाण वाढते.

गर्भधारणेच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये हार्मोनल बदल होतात. या बदलांमुळे स्तनांमध्ये एक प्रकारचा जडपणा जाणवतो, मात्र गर्भधारणेदरम्यान काही काळानंतर ही समस्या दूर होते. जर एखादी स्त्री गरोदर असेल तर तिला काही खाद्यपदार्थांचा वास खराब वाटू शकतो आणि काही गोष्टींचा वासही चांगला असू शकतो, ज्या चांगल्या नसतील. काही स्त्रियांच्या बाबतीत असंही घडतं की, त्यांना आधी आवडलेल्या गोष्टी वाईट वाटू लागतात आणि न आवडलेल्या गोष्टी आता त्यांना आवडतात.

# माथेरानमध्ये आमदार महेंद्र थोरवेंसाठी जोरदार प्रचार

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांनी जवळपास २९०० कोटी रुपयांचा भरीव निधी आणून अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे मार्गी लावलेली आहेत. त्यातच माथेरानसारख्या दुर्गम पर्यटनस्थळासाठीसुद्धा आपले मोलाचे योगदान देऊन जवळपास पावणेदोनशे कोटींचा निधी खर्च करून उत्तम प्रकारे कामे मार्गी लावलेले आहेत. यामुळे माथेरानमधील महायुतीचे कार्यकर्ते आमदार महेंद्र थोरवे यांच्या विजयासाठी जोरदार प्रचार करीत आहेत.

यामध्ये महिला वर्गाची पण मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दिसत असून महायुतीचे ज्येष्ठ कार्यकर्तेसुद्धा या प्रचारात सामील झाले आहेत.

माथेरानमधील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सर्वांनी एकच ध्यास घेतलेला दिसत आहे की, पुन्हा एकदा भरघोस मतांनी आमदार महेंद्र थोरवे हे विजयी व्हावेत, यासाठी माथेरान शहरातील महायुतीचे कार्यकर्ते हे जीवाचे रान करताना दिसत आहेत.

प्रचारातील भेटीगाठी दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या सर्व मतदार लाडक्या बहिणी सर्वांचे आनंदाने स्वागत करीत असून आपला जाहीर पाठिंबा दर्शवताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद स्पष्टपणे दिसून येत आहे.





माथेरानमधील महायुतीचे असंख्य कार्यकर्ते नियमितपणे प्रचारात सहभागी होऊन एकदिलाने व जोमाने प्रचार करताना दिसत आहेत.

माथेरानमधील एकूण मतदारसंख्या ४०००च्या आसपास असून यातील २०००पेक्षा अधिक मते उमेदवार महेंद्र थोरवे यांना मिळवून देऊ, असा उत्साह कार्यकर्त्यांच्या प्रचारफेरीवरून तसेच मतदारांशी साधत असलेल्या संपर्कावरून स्पष्टपणे दिसून येत आहे.

**महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांना पुन्हा एकदा विधानसभेवर पाठवण्याचा निर्धार महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला आहे. माथेरान पर्यटन वाढीचे प्रयत्न आमदारांनी केले असल्याने पुन्हा एकदा थोरवे आमदार होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे माथेरानमधून भरघोस मताधिक्य दिले जाईल.**
**-प्रवीण सकपाळ,**
**भाजप शहराध्यक्ष, माथेरान**

**माथेरानमध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार महेंद्र थोरवे यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महिलांच्या तर चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आहे. त्यामुळे आमदार महेंद्र थोरवे पुन्हा एकदा प्रचंड मतांनी निवडून यावेत हे प्रचारादरम्यान दिसून आले.**
**-प्रमोद नायक, शिवसेना**
**उपशहर प्रमुख, माथेरान**

**गेल्या पाच वर्षांत कर्जत तालुक्याचे जे रुपडे पालटले आहे ते खरोखरच प्रशंसनीय आहे. पर्व २मध्ये महेंद्र थोरवे हे निवडून येण्यासाठी लाडक्या बहिणी, ज्येष्ठ नागरिक, तरुण, वारकरी मंडळींनीही निवडणूक हातात घेतली आहे. हे २३ तारखेच्या निकालातून स्पष्ट दिसेल.**
**-भास्कर शिंदे, उद्योजक, माथेरान**

## रोह्यात ना. आदिती तटकरे यांच्या प्रचारात मुस्लिम बांधवांचाही सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरात महायुतीच्या उमेदवार महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या विजयासाठी शहरातील मोहल्ला येथे गुरुवारी (दि.१४) प्रचार करण्यात आला. घरोघरी प्रचारपत्रक वाटप करण्यात आले. या प्रचारफेरीत महायुतीच्या कार्यकर्त्यांसह मुस्लिम बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, महिलाध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, रिदवाना शेटे, शिल्पा धोत्रे, अफरीन रोगे, कादीर रोगे, रियाज शेटे, निसारभाई, डबीर, माज सवाल, सरफराज बंदरकर, सनाउल्ला दर्जी, समिर दर्जी, विकास शिंदे, सनी पितळे, स्वप्निल धनावडे, आसावरी मोकल आदी प्रचारात सहभागी झाले होते.



## एम.बी. मोरे स्कूलमध्ये मतदान जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम



**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाउंडेशन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मतदान जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची सुरुवात सर्व विद्यार्थ्यांनी मतदार शपथ घेऊन केली. आपले मतदान या विषयावर रंगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मताधिकाराचे महत्त्व रंगांच्या माध्यमातून साकारले.

मतदान हा माझा अधिकार या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी पथनाट्य सादर केले, तसेच पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमात शिक्षक-विद्यार्थी तसेच काही पालकांनीही मानवी साखळीद्वारे मतदानाचे महत्त्व दर्शवले. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी संकल्प पत्र लिहून त्यांना मतदानास प्रोत्साहित केले. मतदान जनजागृतीसाठी रॅली काढण्यात आली. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांनी घरोघरी भेट देऊन मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. शाळेत एक प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया घेण्यात आली ज्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. काही विद्यार्थ्यांनी पोलीस आणि मतदान अधिकारी बनून मतदान प्रक्रियेची जवळून ओळख करून घेतली.

या कार्यक्रमांसाठी मुख्याध्यापिका तेजल सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, शिक्षकवर्ग आणि कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

## मुरूडमध्ये ३२४ ज्येष्ठ नागरिकांचे गृहमतदान


**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील ३२४ ज्येष्ठ नागरिकांनी शुक्रवारी (दि.१५) मतदान केले. या मतदानासाठी तहसील कार्यलयाकडून विशिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.



या वेळी मुरूड शहरारमधील भंडारवाडा, कोळीवाडा तसेच अन्य भागातील ज्येष्ठ नागरिकांचे मतदान घेण्यात आले. तहसील कार्यालयातर्फे सांगण्यात आले की, ज्येष्ठ नागरिक त्याचप्रमाणे अपंग व्यक्ती ज्यांना मतदान केंद्रवार पोहचणे अशक्य आहे, अशा नागरिकांच्या घरी जाऊन मतदान घेण्याची प्रक्रिया पार पाडली जाते.

## खालापूर तालुक्यात पोलिसांचा रूटमार्च



**चौक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी खालापूर पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. त्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. खालापूर पोलीस ठाणे स्तरावर गावात आणि शहरात मोठ्या फौजफाट्यासह रूटमार्च काढण्यात आला.

गुन्हेगार आणि सामाजिक तत्वांवर दबाव निर्माण करण्यासाठी पोलीस अनेक उपाययोजना करीत आहेत. नुकतेच महत्त्वाच्या मार्गावरून व संवेदनशील भागात पोलिसांनी रूटमार्च काढला. यामध्ये संबंधित खालापूर वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार व प्रभारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात केंद्रीय पोलीस दलाचे जवान, होमगार्ड, दंगा नियंत्रण पथक, शीघ्र कृती दलाचे जवान व पोलीस स्टेशनचे इतर अधिकारी, अंमलदारांचा समावेश होता.

कायद्याचे पालन करीत प्रशासनाला सहकार्य करावे. कोणतीही व्यक्ती जातीय तेढ निर्माण करणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. जर कोणी सोशल मीडियावर एखादा मेसेज येत असेल व त्या मेसेजला एडिटिंग, वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर लाऊन आचारसंहितेचा भंग करून कायदा सुव्यवस्था बिघडण्याचा प्रयत्न करीत असेल तर संपर्क साधण्याचे आवाहन वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

निवडणूक आचारसंहिता आणि हिवाळी हंगाम यामुळे जिल्ह्यात वाहतूक पोलिसांनी आपली गस्त वाढविली आहे. बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि.१४) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण २८५ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ६७ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ठिकठिकाणी पोलीस पथके तैनात करण्यात आली असून गैरप्रकार होऊ नये, यासाठी प्रत्येक वाहनाची तपासणी करण्यात येत आहे.

## आवासमध्ये श्री नागेश्वराच्या भव्य यात्रेला भाविकांची गर्दी







**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील आवास येथील नागेश्वराची यात्रा भरविण्यात आली होती. शुक्रवारी (दि.१५) पहाटे ३ वा.पासून रात्रीपर्यंत सुमारे दोन लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

यात्रेत आकाशपाळणे तसेच वस्तूची दुकाने थाटण्यात आली आहेत. वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती, तसेच मिठाई, लहान मुलांची खेळणी, हार फुले आदी दुकाने थाटले होते. ग्रुप ग्रामपंचायत आवासतर्फे भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाण्याची व्यवस्था तसेच आरोग्य यंत्रणेमार्फत आरोग्य सुविधा तसेच शौचालयाची सुविधा करण्यात आली होती.

यात्रेनिमित्त अलिबाग एसटी आगराच्या माध्यमातून ज्यादा गाड्यांची व्यवस्थाही करण्यात आली, तसेच रेवस-करंजा बोटसेवेच्या सलग बोटी सोडण्यात आल्या. यात्रेत कायदा सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राखण्यासाठी मांडवा सागरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप भोई व पोलीस कर्मचाऱ्यांनी चांगली व्यवस्था केली.

यात्रेकरिता शेतकरी वर्ग बैलगाडी घेऊन येण्याची अनेक वर्षाची परंपराही जोपासत शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने बैलगाडी घेऊन यात्रेसाठी आले. साजगावच्या यात्रेनंतर जिल्ह्यात यात्रांचा हंगाम सुरू होतो. त्याप्रमाणे आवासची यात्रा भरली होती.

## मुरूडमध्ये शिबिरात १४७ जणांचे रक्तदान

**मुरूड : प्रतिनिधी**

जंजिरा मेडिकल असोसिएशन, अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन, जयश्रीराम नागरी पतसंस्था, रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लड बँक सिव्हिल हॉस्पिटल यांच्या सौजन्याने येथील कल्याणी हॉस्पिटलमध्ये नुकतेच रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १४७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.


या वेळी जंजिरा मेडिकल असो. अध्यक्ष डॉ. संजय पाटील, अलिबाग- मुरूड मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. सुनिता पाटील, माजी अध्यक्ष डॉ. मयुर कल्याणी, जिल्हा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, भारतीय तटरक्षक दलाचे कमांडट राजेश दौलखंडी, मुरूड पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, डॉ. अमित बेनकर, डॉ. राज कल्याणी, जिल्हा रक्तपेढीचे प्रमुख डॉ. दीपक गोसावी, डॉ. परदेशी, डॉ. पेशईमाम, डॉ. इप्सित पाटील, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. मंगेश पाटील, डॉ. हितेश जैन, पॅथॉलॉजिस्ट सुनील पटेल, जय श्रीराम नागरी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन प्रा. मेघराज जाधव, कोषाध्यक्ष बाळकृष्ण कासार, सचिव सुनील विरकुड, सरव्यवस्थापक संजय ठाकूर, उमेश भायदे आदी उपस्थित होते.



## चौक येथील ज्येष्ठांनी बजावला मतदानाचा हक्क

**चौक : प्रतिनिधी**

चौक येथील ९० वर्षांवरील दत्तात्रेय दबके यांनी आपल्या घरी मतदानाचा हक्क बजावला असून खालापूर तालुक्यातील चौक परिसरातील आणि उरण विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवाराला मतदान झाले.



केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. दरम्यान राज्यात २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या वेळी निवडणूक आयोगाने ८५ वर्षे वयावरील मतदार, दिव्यांग मतदार यांना घर बसल्या मतदानाचा अधिकार दिला आहे. नागरिकांसाठी घरबसल्या मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली असल्याने मतदानाची टक्केवारी देखील वाढेल, असे मतदारांना वाटते.

**नावात बदल**

माझे जुने नाव **इशा जितेंद्र देशमुख, राहणार फ्लॅट नं. १२०३, नं. ११८/१४/११८/२०, प्रोफाईल प्रॉपर्टीज, पुणे-४११०२१ (महाराष्ट्र)** हे माझे जुने नाव असून, मी **महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. पी-२४३९०५६ दि. १/०८/२०२४** रोजी इशिता जितेंद्र देशमुख असे बदलले असून, या पुढे मी **इशिता जितेंद्र देशमुख** या नवीन नावाने ओळखली जाईन.

दि. १५/११/२०२४
पनवेल

सही/-
**इशिता जितेंद्र देशमुख**

# निकाल लागल्यावर राज्यात महायुतीची सत्ता असेल

## खासदार सुनील तटकरे यांचा मोर्बे येथील सभेत दावा



**माणगाव : प्रतिनिधी**

ज्या ज्या वेळी मी मोर्बेकरांशी संवाद साधला त्या त्या वेळी निवडणुकीत १०० टक्के यश प्राप्त झाले. मोर्बा तटकरे कुटुंबाचा बालेकिल्ला होता, आहे आणि यापुढेही राहिल. २३ तारखेला निकाल लागल्यावर राज्यात महायुतीची सत्ता बहुमताने आलेली असेल, असा दावा खासदार सुनील तटकरे यांनी केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.१३) मोर्बा येथे सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, जिल्हा सरचिटणीस अल्ताफ धनसे, युवक अध्यक्ष शादाब गैबी, तालुकाध्यक्ष बाळाराम नवगणे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार तटकरे पुढे म्हणाले की, माझ्या आयुष्यात कधी जात, पात, धर्म आला नाही. काँग्रेस, महाविकास आघाडीच्या काळात अल्पसंख्याक मंडळाला निधी मिळाला नाही. ५० कोटीवरून २०० कोटींपर्यंत निधी नेण्याचे काम माझ्यामार्फत झाले. अल्पसंख्याक विभागाला महायुती सरकार माध्यमातून १००० कोटींचा निधी उपलब्ध झाला. लाडकी बहीण योजना राबविली गेली. भारत सरकारच्या माध्यमातून दिघी औद्योगिकरण व वसाहतीसाठी ४० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. यामध्ये स्थानिकांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आदिती तटकरे यांना भरघोस मतदान करून विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

**INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.**
S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

**TENDER NOTICE**
**HOUSEKEEPING SERVICES**
CONCOR invites sealed tender for the following work :-

| | |
|---|---|
| Tender N. & Date | Ref.: masik sabha Dated 9/11/2024 CONCOR/IBG/SOC/ Security Services 2024-2025 Dt. 16/11/2024 |
| Description of Work | Tender for hiring of Security Services |
| Cost of Tender Document | Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST |
| Earnest Money Deposit | Rs. 1,00,000/- (Rs. One Lakh Only) |
| Mode of Payment (Bank Details) | Draft favoring "Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd." at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch |
| Contract Period | 1 year |
| Dt. of Sale of Tender Document | From 16/11/2024 TO 25/11/2024 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office |

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 25/11/2024
Tender Opening Date: 26/11/2024 -11.00 a.m. at Society Office

तारीख :16/11/2024
स्थळ : पनवेल

सही/- अध्यक्ष सही/- सचिव
इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.

**INDIABULLS GREENS TULIP CO.OP.HSG.SOC.LTD.**
S.No. 80/A, 83/2A, 83/3, 83/7+5B, 85/0, 86/1, 91/1A, 91/1B, 90/4, 90/7, 90/8, 90/9, 90/11, 91/5 Indiabulls Greens Kon, Post-Ajivali, Tal. Panvel, Dist. Raigad.

**TENDER NOTICE**
**SECURITY SERVICES**
CONCOR invites sealed tender for the following work :-

| | |
|---|---|
| Tender N. & Date | Ref.: masik sabha Dated 9/11/2024 CONCOR/IBG/SOC/ Security Services 2024-2025 Dt. 16/11/2024 |
| Description of Work | Tender for hiring of Security Services |
| Cost of Tender Document | Rs.2000/-(Rs. Two Thousand Only) including GST |
| Earnest Money Deposit | Rs. 1,00,000/- (Rs. One Lakh Only) |
| Mode of Payment (Bank Details) | Draft favoring "Indiabulls Greens Tulip Co-Operative Housing Society Ltd." at Panvel (Ac No. 020010800081468 IFSC Code IBKL0299RDC) Bank Name - The Raigad D.C.C. Bank Ltd - Panvel Branch |
| Contract Period | 1 year |
| Dt. of Sale of Tender Document | From 16/11/2024 TO 25/11/2024 During Office Hours in 11.00 am to 15.00 pm Society Office |

Date of Tender Submission Before 17.00 Hrs on 25/11/2024
Tender Opening Date: 26/11/2024 -11.00 a.m. at Society Office

तारीख :16/11/2024
स्थळ : पनवेल

सही/- अध्यक्ष सही/- सचिव
इंडियाबुल्स ग्रीन्स तुलीप को.ऑप.हौ. सोसा.लि.

## निवडक

### उरण येथे आरोग्य शिबिर



**उरण :** भारतीय नौदलाच्या नेव्ही वीक सेलिब्रेशन २०२४चा एक भाग म्हणून, INHS संधानी आणि नेव्हल स्टेशन करंजा यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.१४) उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूल, पलक मैदान येथे आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन सर्जन रिअर डमिरल दिलीप राघवन, कमांडिंग ऑफिसर, INHS अश्विनी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कमोडोर सी रामी रेड्डी, SO(K), उरण एज्युकेशन सोसायटी (UES)चे अध्यक्ष तनसुख जैन आणि सदस्य आदी उपस्थित होते. या शिबिरात ५००हून अधिक लोकांनी शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात डॉक्टर, शल्यचिकित्सक, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, कान-नाक-घसा विशेषज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, दंतवैद्य आणि त्वचारोग, रक्त तपासणी, डोळे तपासणी करून चष्मे मोफत देण्यात आले.

### आदिवासीपाड्यात स्मार्ट टीव्ही भेट



**पनवेल :** कर्जतमधील पिंपळपाडा या आदिवासी भागातील शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत एकूण २५ मुले मुली शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांना ई-लर्निंग आणि अध्यापनात गोडी निर्माण व्हावी यासाठी दिशा महिला मंच व धीरज स्नेह उपहार यांच्या वतीने बालदिनाचे निमित्त साधून स्मार्ट टीव्ही या शाळेस भेट दिला. या वेळी दिशा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे, धीरज स्नेहउपहारच्या समाजसेविका इंदू झा, दिशा संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते, सदस्य रेखा ठाकूर, तनया आंधळे तसेच मुख्याध्यापक आशिष वाळवी व शिक्षक हणमंत गावडे उपस्थित होते.

### मतदान माहिती पत्रकाचे अनावरण



**नवी मुंबई :** मतदानाविषयी आवश्यक माहिती उपलब्ध होऊन एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेने नियोजन केले असून मतदानाविषयी आवश्यक माहिती देणारे माहितीपत्रक घरोघरी वाटप करण्यात येत आहे. या माहिती पत्रकाचे अनावरण नुकतेच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपायुक्त अभिलाषा म्हात्रे पाटील, बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्त सागर मोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# रानडुकरे करताहेत भातपिकांचे नुकसान

**उरण : वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या भातपिकांवर आता जंगली रानडुकरे मोकाट गुरे आणि जंगली वानरांचा मुक्त संचार होत असल्यामुळे, चिरनेर गावासह परिसरातील अन्य गावातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. या प्राण्यांची वक्रदृष्टी पडल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे.

यंदा परतीच्या पावसाने भातपिके तयार होण्याच्या अखेरच्या वेळेला दररोज सायंकाळच्या वेळेला बरसायला सुरुवात केल्याने भातपिके संकटात सापडली होती. आता पाऊस माघारी गेल्याने शेतकऱ्यांनी भात कापणी, बांधणी, झोडणीच्या कामाला सुरुवात केली आहे, मात्र शेतमजुरांच्या अभावी शेतकऱ्यांच्या भातपिकांच्या कापणीची कामे लांबवली आहेत.



शेतमजूर वेळेवर मिळत नसल्यामुळे शेतकरी रडकुंडीला आला आहे. अशातच शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. येथील काही शेतकऱ्यांच्या भातपिकांची रानडुकरांनी एवढी नासाडी केली आहे की, ही भातपिके कापणी बांधणीच्या लायक राहिली

### शेतकऱ्यांवर राखण करण्याची वेळ

नसल्यामुळे शेतकऱ्यांनी नासाडी झालेल्या भातपिकांची कापणीच केली नसल्याचे येथील शेतकरी कृष्णा म्हात्रे, दिनेश म्हात्रे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास कळपाने पिकांवर हल्ला करणारी रानडुकरे आणि मोकाट गुरे हिरावून नेत असल्याने मोकाट गुरांचा व रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, आवरे, साई, दिघाटी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. परिणामी उरण तालुक्यात रानडुकरांपासून भातपिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री पहारा देण्याची वेळ ओढवली आहे, मात्र भात पिकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रतिकारात रानडुक्कर मारला गेल्यास शेतकऱ्याविरूद्ध शिकारीचा गुन्हा दाखल होत असल्याने कोणीही असा प्रतिकार अथवा बंदोबस्त करण्याच्या मनस्थिती दिसून येत नाही.

परिणामी शेतकऱ्यांच्या शेताची नासधूस होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत वनखाते, कृषी विभाग, पोलीस खाते तसेच स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन यांच्याकडे वारंवार या प्राण्यांपासून नुकसान होत असल्याच्या लेखी तक्रारी करूनदेखील या सर्व खात्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून कित्येक वर्ष वेळ मारून नेली असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले.

## ड्रग्स विक्रेत्यांचा दोघांवर जीवघेणा हल्ला

### आठ जणांवर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

झोपडपट्टीत सुरू असलेल्या ड्रग्स विक्रीला विरोध करीत पोलिसांकडे तक्रार करण्यासाठी चाललेल्या दोघांवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एपीएमसी पोलिसांनी सात ते आठ जणांच्या जमावावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एपीएमसीमधील ग्रीन पार्क झोपडपट्टी परिसरात मंगळवारी संध्याकाळी हा प्रकार घडला आहे.




रिक्षाचालक निखिल बाविस्कर हा संदीप साठे यांच्यासह चालला होता. या वेळी झोपडी बाहेर गर्दी दिसल्याने ते त्याठिकाणी गेले असता तिथे ड्रग्स विक्री सुरू असल्याचे दिसले. निखिलने पोलिसांकडे तक्रारीचा इशारा दिला. याचा राग आल्याने महिला, मुलांनी साथीदारांना सांगितले. त्यामुळे घाबरलेल्या दोघांनीही तिथून पळ काढला असता जमावाने त्यांना घेऊन लाद्या, चाकूने हल्ला केला.

ग्रीन पार्क झोपडपट्टीत गुन्हेगारी टोळक्यांचे वास्तव्य असून ड्रग्स विक्रीचे अड्डे आहेत.

अनेकदा कारवाई करूनही एकावर कारवाई झाल्यास कुटुंबातील इतरांकडून अड्डे चालवले जात आहेत. अनधिकृत झोपड्या हटवण्याची मागणी होत आहे.

## भरत थळी सेवानिवृत्त

**उरण : वार्ताहर**

मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कंपनीच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून कामगार भरत जीवन थळी हे नुकतेच निवृत्त झाले. त्यांचा निवृत्ती सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्लांट हेड राहुल देशक यांच्या हस्ते भरत थळी यांना प्रशिस्तीपत्र, शाल, श्रीफळ देण्यात आला. त्याच प्रमाणे श्रमिक सेना युनियनच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कंपनी प्लांट ॲडमिनचे सिनिअर मॅनेजर आय. बी. सिंग, निशा जालनावाला, गणपत दाटेकर, भरत थळी यांचे कुटुंबीय, जीवन थळी, सुनील पाटील, किरण घरत, विजय पवार, श्रमिक सेनेचे अध्यक्ष लक्ष्मन रेवणे व दोन्ही युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते. भरत थळी यांनी सर्वांचे आभार मानले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार जागृतीपर व्याख्यान



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृतीपर व्याख्यान बुधवारी (दि.१३) झाले. नरेश मोकाशी, स्वीय पथक अधिकारी म्हणून उपस्थित होते. मोकाशी यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मतदान हक्कांविषयी मार्गदर्शन केले.

रुपेश पाटील यांनी आपल्या मनोगतातून आजचा तरुण आणि त्याचा मतदान हक्क, मतदान हा प्रत्येक नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्याने तो बजावला पाहिजे. निर्मला मच्छींद्रनाथ घरत यांनी मतदार सेल्फीविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्र. प्राचार्य, डॉ.आमोद ठक्कर यांनी आजच्या तरुणांनी मतदानाविषयी सजग व जागरूक राहून आपला मतदानाचा हक्क बजवला पाहिजे, असे व्यक्त केले.

या वेळी मी मतदान करणार म्हणून नवमतदारांकडून सह्यांची मोहीम राबविण्यात आली तसेच विद्यार्थ्यांचे सेल्फी घेऊन मतदान करण्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.

कार्यक्रमाचे आभार प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय सेवा योजना चेअरमन यांनी मानले. उपप्राचार्य, डॉ. विलास महाले, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. मयुरी मोहिते, प्रा. आचल बिनेदार, डॉ. झेलम झेंडे, डॉ. सुजाता पाटील उपस्थित होत्या.

## 'आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे सांस्कृतिक कार्य रायगडमध्ये वृद्धिंगत'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या देशात संस्कृती आणि सांस्कृतिक कार्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. हे कार्य पनवेलसह रायगडमध्ये वृद्धिंगत करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे, असे प्रतिपादन रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांनी केले.



पनवेल विधानसभा निवडणुकीसाठी अधिकृत असलेले महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने सांस्कृतिक उपक्रमे राबवत कलेला महत्व दिले आहे. दरवर्षी राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा, राज्यातील सर्वात मोठी दिवाळी अंक स्पर्धा, शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन संगीत सुश्राव्य मैफिल, देशाची संस्कृती असलेला मल्हार महोत्सव, दर्जेदार दिवाळी पहाट, असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी नियमितपणे आयोजित करून संस्कृती जोपासण्याचे काम होत आहे. नवीन कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांनी मासिक सभेच्या माध्यमातून व्यासपीठ मिळवून दिले आहे. यामधून हजारो कलाकार तयार झाले आहेत. त्याचबरोबरीने जागतिक विक्रम झालेल्या १९२ तासांच्या अखंड भजन महोत्सवाचे आयोजन करून वारकरी सांप्रदायाची परंपरा जपली. त्याचबरोबरीने वारकरी सांप्रदायातील मान्यवर मंडळींचा सत्कार सन्मान सोहळा आयोजित करून त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्याचे काम त्यांनी केले आहे.

त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करण्याची आवश्यकता असल्याचे पं. उमेश चौधरी यांनी म्हटले आहे.



**पनवेल : एच. एम. मोटर्सचे मालक हर्षल सूचक आणि सहकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी त्यांचे महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर व भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी पक्षात स्वागत केले. शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, विनायक मुंबईकर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रतीक सादराणी, निल पुजारा, हारुशेठ कोळी, रोशन ठाकूर, पवन सोनी आदी उपस्थित होते.**

## पनवेल उरण ग्रुपची गुजरात धार्मिक सहल

**पनवेल :** माऊली सहल ग्रुपकडून पनवेल-उरणच्या पर्यटकांची आठ दिवस गुजरात सहल आयोजित करण्यात आली होती.

या सहलीत नीलकंठ धाम, नर्मदा स्नान, कुबेर भवन, कालिका माता मंदिर, पावागड, डाकोर, लक्ष्मी मंदिर, डाकोर भगवान मंदिर, जलाराम मंदिर, बारा ज्योतिर्लिंग मंदिर, गायत्री मंदिर, अक्षरधाम मंदिर, मोगल माता मंदिर गिरनार, अंबिका माता मंदिर, श्री दत्तगुरू मंदिर, लक्ष्मी दामोदर मंदिर, संत नरसी मेहता मंदिर, जुनागढ किल्ला, भाल का तीर्थ,सोमनाथ मंदिर,



भवानी मातामंदिर, सोमनाथ, पोरबदर, पोरबंदर बीच, राम मंदिर, पोरबंदर रोकडीया हनुमान मंदिर, गांधी भवन, गायत्री मंदिर, मूळ द्वारका, आदी दर्शन देण्यात आले.

## नवी मुंबई मनपातर्फे मतदान जनजागृती बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न केले जात असून गुरुवारी (दि.१४) मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात विविध सोसायट्या, नवी मुंबई हॉटेल्स असोसिएशन, मार्केट असोसिएशन, ठाणे बेलापूर इंडस्ट्रिज असोसिएशन यांचे पदाधिकाऱ्यांची मतदार जनजागृती बैठक महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या वेळी नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदारसंघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे व संतोष वारुळे, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपायुक्त अभिलाषा म्हात्रे पाटील, बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्त सागर मोरे



उपस्थित होते.

या वेळी नागरिकांना मतदान करण्यासाठी सोयीचे जावे यादृष्टीने त्यांना मतदार चिठ्ठ्यांचे वाटप सुरू करण्यात आले असल्याचेही सांगण्यात आले.

मतदान केंद्रावर आवश्यक सर्व सुविधा पुरविण्याची दक्षता घेण्यात आली असून त्याठिकाणी फलक लावून नेमके कोणत्या खोलीमध्ये मतदान आहे याची माहिती प्रसिद्ध केली जाणार आहे, तसेच तेथील रांगेच्या व्यवस्थापनासाठी १८ वर्षाखालील म्हणजे मतदार नसलेल्या एनएसएस व एनसीसी विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. त्याचप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी ऊन लागू नये म्हणून मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, पिण्याच्या स्वच्छ व शुद्ध पाण्याची व्यवस्था, मोबाईल प्रसाधनगृह व्यवस्था, लाईट व्यवस्था, पंखे व्यवस्था, व्हिलचेअर व्यवस्था, पार्किंग व्यवस्था अशा विविध सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

या वेळी बेलापूर विभागातील १२ व ऐरोली विभागातील दोन मोठ्या सोसायटयांच्या आवारातच मतदान केंद्रे असणार आहेत, जेणेकरून नागरिकांना सुविधाजनक व्हावे याकडेही लक्ष देण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे मतदानाच्या दिवशी जोडून सुट्टी आल्याने मतदार बाहेर जातात व मतदानापासून वंचित राहतात, मात्र या वेळी बुधवार हा मधलाच वार असल्याने प्रत्येकाने त्याला कामाच्या ठिकाणाहून मिळालेली सुट्टी अथवा वेळेतील सवलत मतदान करण्यासाठी उपयोगात आणावी असेही या वेळी सूचित करण्यात आले.

विशेषत्वाने उदयोग समूहात काम करणारे कर्मचारी तसेच हॉटेल्समधील कर्मचारी यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करावे व त्यांना सूट द्यावी, अशाही सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

## विद्याभवनच्या मराठी शाळेत बाल दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत पं. जवाहरलाल नेहरू यांची जयंती म्हणजेच बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष, प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. उपेंद्र शंकर किंजवडेकर हे उपस्थित होते.

या वेळी तुमचा स्क्रीन टाईम कमी करा आणि ग्रीन टाईम वाढवा, असा संदेश डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांनी दिला. ग्रीन टाईममध्ये दररोज मैदानी खेळ खेळा, निसर्गाच्या जवळ जा व सान्निध्यात रहा. सकस आहार घ्या, पुरेशी आठ तास झोप घ्या, नियमित अभ्यास करा, सातत्य ठेवा, प्रयत्न करत रहा. विकसित भारत घडविण्यासाठी तुम्ही सर्वजण देशाचे भविष्य आहात. उत्तम आरोग्य ठेवा व चांगला अभ्यास करून शाळेचे व देशाचे नाव उज्वल करा, असे सांगितले.

दिल्लीतील कॅप्टन मंजिंदरसिंग भिंडर यांची थरारक घटना सांगितली आणि सोल्जरने ही कोठेही केलेली सेवा ही देशसेवा समजली जाते, असे सांगून सर्वांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



या बालमेळाव्यात विद्यार्थ्यांसाठी पालकांनी विविध खाऊचे स्टॉल मांडले होते, तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी बालगोपाळांसाठी खेळाचे विविध स्टॉल मांडले. सर्व विद्यार्थ्यांनी या बालमेळाव्याचा मनसोक्त आनंद लुटला.

या वेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष रणजीत दीक्षित, पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनिषा मुळीक, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक, सर्व पालक, शिक्षक व बालगोपाळ मंडळी उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणासाठी महायुती कटिबद्ध

## मंत्री आदिती तटकरे यांची माणगावमध्ये ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**

महायुतीसाठी राज्यात चांगली आणि अनुकूल परिस्थिती आहे. सकारात्मक प्रतिसाद प्रत्येक ठिकाणी मिळत आहे. महायुती सरकार महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कटिबद्ध आहे, अशी ग्वाही श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, आरपीआय व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांनी केले. त्या माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड येथील कॉर्नर सभेत बोलत होत्या.



या सभेला शिवसेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर, नगरसेवक तथा पाणीपुरवठा सभापती प्रशांत साबळे, महिला तालुका अध्यक्ष संगीता बक्कम, शहराध्यक्ष योगिता चव्हाण, तालुका उपाध्यक्ष गणेश चव्हाण, शहराध्यक्ष नितीन वाढवळ, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, दिलीप जाधव, संदीप खरंगटे, नगरसेविका रिया उभारे, ममता थोरे, रत्नाकर उभारे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, माजी नगरसेवक जयंत बोडरे, माजी नगरसेविका भाग्यश्री यादव, दिलीप जाधव, स्वीकृत नगरसेवक मनोज पवार, सुमित काळे, शहरप्रमुख सुनील पवार, उपशहरप्रमुख प्रसाद धारिया, चेतन गव्हाणकर, सचिन देसाई, सुवर्णा जाधव आदींसह कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, येथील मंजूर झालेली जी विकासकामे आहेत ती तुमच्या सर्वांच्या पाठपुराव्याने करण्याची संधी मला मिळाली. आम्ही गेल्या १५–१६ वर्षांपासून खासदार सुनील तटकरेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली केलेली विकासकामे, अनेक योजना असतील; त्याचप्रमाणे दांडगा जनसंपर्क यातून मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त आहे. प्रत्येक तालुका अधिक विकसित होण्यासाठी आम्ही काम केले.

महायुती सरकारच्या माध्यमातून माणगाव शहरासाठी ५६ कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर करून आणली. नगरपंचायतीच्या इमारतीला निधी मंजूर करून आणला. शहरातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी ९६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. अशा प्रकारे महायुती सरकारच्या माध्यमातून शहरातील विकास कामांना आपल्याला गती देता आली. या विकासकामांबरोबरच जनतेला वैयक्तिक योजनांचा लाभही महायुती सरकारने दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आपण महिला व बालविकास खात्याची मंत्री म्हणून महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. या योजनेंतर्गत एका कुटुंबातील २१ ते ६५ वयोगटातील दोन महिलांना दरमहा १५०० रुपये सन्मान निधी महायुतीचे सरकार देत आहे. पुन्हा आमचे सरकार आल्यास या सन्मान निधीत वाढ करून २१०० रुपये महिलांना दरमहा सन्मान निधी त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. ही योजना महायुतीच्या सरकाने कायमस्वरूपी राबविण्यासाठी आणली आहे, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने मी विधानसभेत प्रतिनिधित्व करीत असल्याने लोकहिताची कामे मला करता आली. यापुढेदेखील विधानसभेत आवाज उठविण्यासाठी तुमच्या घरातील हक्काची व्यक्ती समजून मला घड्याळ निशाणीवर मतदान करून निवडून देऊन आपली प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्यावी, असे आवाहनही ना. तटकरे यांनी या वेळी केले.

# रेवदंडा कोळीवाडा येथील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षे रेवदंडा शेकापचा बालेकिल्ला असलेल्या मधला कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला.

मधला कोळीवाडा मतदारांमुळे रेवदंडा ग्रामपंचायत वार्ड क्र.६मध्ये शेकापला बळकटी मिळत असे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आदी निवडणुकांमधून शेकापला येथून चांगले मतदान मिळायचे, मात्र आमदार महेंद्र दळवी यांचे कार्यप्रणाली व विकासकामांचा धडाका यांनी प्रेरीत होऊन ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला.

रेवदंडा मधला कोळीवाडा येथील विघ्नहर्ता मंदिराचे प्रांगणात कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांच्यासह भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, राष्ट्रवादी जिल्हा सचिव आशिष भट, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, भाजपचे माणिक बळी, सहकार संस्था जिल्हा संघटक दिलिप पटेल, नारायण गोसावी, तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार महेंद्र दळवी यांनी ग्रामस्थांचे पक्ष्यात स्वागत केले.

सरपंच प्रफुल्ल मोरे यांनी रेवदंडा परिसराच्या विकासासाठी आमचे पूर्ण सहकार्य व पाठिंबा आमदार महेंद्र दळवी यांना असल्याचे त्यांनी म्हटले. या वेळी ॲड. महेश मोहिते यांनीही मार्गदर्शन केले.



# टपाली मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील टपाली मतदानाला गेल्या दोन दिवसांपासून सुरुवात झाली आहे. अलिबाग तहसील कार्यालयापासून पोलीस अधीक्षक कार्यालयातील समाधान कक्षात टपाली मतदान सुरू झाले आहे. या मतदानाला अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कर्मचारी स्वयंस्फूर्तीने मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पुढे सरसावले आहेत.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, महाड, श्रीवर्धन, पेण, कर्जत, उरण, पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदान येत्या २० नोव्हेंबरला होणार आहे. २४ लाखांहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियचे कामकाज चांगले व्हावे यासाठी प्रयत्न करीत असताना मतदानापासून ते वंचित राहू नये यासाठी कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान सुरू करण्यात आले आहे. सातही विधानसभा मतदारसंघातील तहसील कार्यालयापासून वेगवेगळ्या ठिकाणी सुविधा मतदान केंद्र सुरू करण्यात आले आहे.

टपाली मतदानाला मंगळवारपासून सुरुवात झाली. अलिबागसह अनेक ठिकाणी वेगवेगळ्या विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बुधवारीदेखील मतदानाचा हक्क बजावला.



# ना. आदिती तटकरे यांचा रोहा बाजारपेठेत प्रचार



## कार्यकर्त्यांसह व्यापाऱ्यांचाही सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतशी प्रचारात रंगत वाढत आहे. राष्ट्रवादी पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या रोहा शहरातील बाजारपेठेत महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांचा प्रचार करण्यात आला. या प्रचारात शहरातील व्यापारी बंधूही सहभागी झाले होते.

रोह्यातील मुख्य बाजारपेठ, कुलकर्णी चौक, आडवी बाजारपेठ, तीन बत्ती नाका या ठिकाणी महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून प्रचार करण्यात आला. व्यापाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

या प्रचारावेळी ज्येष्ठ नेते ललित गुजर, दिलीप तलवार, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, महिला अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, भाजप शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी उपनगराध्यक्ष वसंत शेलार, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, स्नेहा अंब्रे, दिलीप सोलंकी, मयूर दिवेकर, वसंत कोठारी, कैलास जैन, जितेंद्र पडवळ, राकेश जैन, रियाज शेटे, मजिद पठाण, परेश दामानी, मनोज जैन, नुरी रोहावाला, राजेश जैन, विलास गुजर, सुनील कोठारी, उमेश शेडगे, मयूर पायगुडे, भरत जैन, रेखा छेडा, हितेश शाह यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते, व्यापारी उपस्थित होते.

**आमच्या अडीअडचणीला तटकरे कुटुंबीय मदत करत असल्याने सर्व व्यापाऱ्यांचा श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अदिती तटकरे यांना पाठिंबा असून त्यांच्या प्रचारार्थ रोहा शहरात मोठ्या प्रमाणात व्यापारी सहभागी झाले होते.**
**–महेंद्र गुजर, माजी गटनेते, रोहा नगर परिषद**

# पोलादपूर व सवाद येथे पोलिसांचे पथसंचलन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलादपूर शहरात तसेच सवाद ग्रुप ग्रामपंचायत क्षेत्रात पोलिसांनी सशस्त्र संचलन केले. याद्वारे पोलिसांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुसज्जता दाखवित नागरिकांना निर्भयपणे मतदानासाठी आश्वस्त केले आहे.




पोलादपूर शहरातील मुख्य बाजारपेठ तसेच मुंबई–गोवा महामार्गावरील पूर्व तसेच पश्चिमेकडील सर्व्हिस रोड, बाजारपेठ, जुना महाबळेश्वर रस्ता या मार्गावरून पोलिसांनी संचलन करून मतदारांना कोणताही अनुचित प्रकार निवडणूक काळात होणार नसल्याचे आश्वस्त केले आहे. पोलादपूर पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी आणि आठ कर्मचारी तसेच गोवा सॅप सी कॉय सशस्त्र पथकाचे दोन अधिकारी, ४४ कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा रूट मार्च काढण्यात आला. नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असा संदेश त्यांनी दिला.

सवाद येथे श्री शंकराच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर पोलिसांसह गोवा सॅप सी कॉय सशस्त्र पोलिसांचा रुट मार्च काढण्यात आला. जत्रोत्सवाच्या रात्री कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, शांतता व सुव्यवस्था कायम रहावी या उद्देशाने सवाद गावात तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर शहरात पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आल्याचे या वेळी स्थानिय गुन्हे अन्वेषण विभागातर्फे सांगण्यात आले.

# रांगोळी स्पर्धेत अनिरुद्ध खेडेकर प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

माऊली फाऊंडेशन नागावतर्फे जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



यात तब्बल २२९ स्पर्धकांनी विक्रमी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत रांगोळीकार अनिरुद्ध संदीप खेडेकर यांनी सांजवात पोर्ट्रेट रांगोळी काढली होती. त्यांच्या या आकर्षक अशा रांगोळीस प्रथम क्रमांक देऊन सन्मानित करण्यात आले.

द्वितीय क्रमांक क्षितिज मळेकर नांदगाव यांनी प्राप्त केला. त्यांनी प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांची रांगोळी साकारली, तर तृतीय क्रमांक स्नेहल घरत आक्षी हिने मिळविला. तिने कोल्हापूर येथील महालक्ष्मी मातेची रांगोळी साकारली होती.

# माथेरानच्या स्वच्छतागृहातील स्वच्छतेकडे होतेय दुर्लक्ष

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान रेल्वेस्टेशनच्या मागील भागात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहात अजूनही घाण आणि दुर्गंधी पसरली असून संबंधित अधिकारीवर्गाला सांगूनही सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता होत नसल्याने भाजप आदिवासी मोर्चा तालुकाध्यक्ष व माजी नगरसेवक संदीप कदम यांनी संताप व्यक्त केला आहे.

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी नेहमी पर्यटकांची रेलचेल सुरू असते. येणाऱ्या पर्यटकांकडून प्रवासी स्वच्छता करदेखील आकारला जातो, मात्र या ठिकाणी नगरपालिका प्राथमिक सुविधा पुरविण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप ते करीत आहेत.



माथेरान रेल्वेस्टेशनच्या मागील बाजूस असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची नगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत नियमित स्वच्छता केली जात नसून याबाबत वरिष्ठ अधिकारीवर्गाला सांगूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे, असेदेखील कदम यांनी या वेळी सांगितले.

# कोकणात तुलसी विवाहाची धामधूम

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकणात तुळशीच्या लग्नाची धामधूम मोठ्या उत्साहात सुरू आहे. मुरूड शहरातील कोळीवाडा परिसरात पुरोहित बोलावून विधीवत लग्नाचा विधी उरकण्यात आला.

कार्तिकी एकादशीनंतर दुसऱ्या दिवसापासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत होईपर्यंत शहरातील आळीतून, तर गावागावात विवाहाचा उत्साह शिगेला पोहचला. याकरिता काही



ठिकाणी पारंपरिक वृंदावन मातीने तयार करून तसेच नव्या युगातील सिमेंटच्या तुलसी वृंदावनाला रंगरंगोटी करण्याची लगबग पहावयास मिळते.

बाजारपेठेत झेंडुची फुले, आवळे, चिंचा, खडके, ऊस, विवाहासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंचे स्टॉल जागोजागी थाटले असून त्याच्या खरेदीसाठी ग्राहकांचा मोठा प्रतिसाद पहावयास मिळाला.

मुरुड शहरातील १५० नागरिकांनी तुलसी विवाह थाटात केला. यासाठी अनेकांनी पुरोहित नियुक्त केला होता. मंगलमय वातावरणात तुलसी विवाह झाला.

# गडकिल्ल्यांवरील वाढती अतिक्रमणे चिंतेचा विषय -सौरभ करडे

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे चिंतेचा विषय आहे. याबाबत समाजाने एकजूट होऊन लक्ष दिले नाही तर पुढची पिढी आम्हाला कधीच माफ करणार नाही. गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची वेळ आल्याचे शिवव्याख्याते सौरभ करडे यांनी खोपोलीत म्हहले.





स्वामी प्रेरणा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित व्याख्यानमालेत करडे बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष राकेश पाठक, संघाचे जिल्हा सहकार्यावर अविनाश मोरे, हिंदू जनजागरण समितीचे रोहित कुलकर्णी, रुपेश मोरे उपस्थित होते.

करडे पुढे म्हणाले की, हिंदू समाज विखुरलेला असून सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकसंघ होण्याची गरज आहे. गोवंश हत्या कायदा केला असतानाही आजही असे प्रकार वारंवार होत असल्याने याकडे साऱ्या समाजाने व शासनानेही लक्ष देणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राणा प्रताप, गुरुगोविंद सिंग या महापुरुषांच्या जीवनावरही त्यांनी प्रकाश टाकला.

सांघिक पद्य दीपक कुवळेकर यांनी सादर केले. उपस्थितांचे आभार करमरकर यांनी मानले.

# अंशुल कंबोजची कमाल!

## रणजी ट्रॉफीत एका डावात घेतल्या सर्व १० विकेट

**रोहतक : वृत्तसंस्था**

हरियाणा आणि केरळ यांच्यात सध्या रणजी ट्रॉफीचा सामना खेळला जात आहे. या सामन्यात हरियाणाचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज याने केरळविरुद्ध पहिल्या डावात सर्व १० विकेट घेतल्या. २१व्या शतकात अशी कामगिरी करणारा तो पहिलाच गोलंदाज आहे.

अंशुल कंबोजने केरळविरुद्ध ३०.१ षटके गोलंदाजी केली. यामध्ये त्याने नऊ षटके निर्धाव टाकली. कंबोजने ४९ धावा देत सर्व १० विकेट घेतल्या. त्याच्या गोलंदाजीच्या जोरावर केरळचा पहिला डाव २९१ धावांमध्ये संपुष्टात आला.

२३ वर्षीय अंशुल कंबोज आयपीएल २०२४मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळला होता. आपल्या पदार्पणाच्या हंगामात त्याने मुंबईसाठी तीन सामने खेळले. यामध्ये त्याने दोन विकेट घेतल्या. आयपीएल २०२५साठी मुंबई इंडियन्सने त्याला रिटेन केलेले नाही. त्यामुळे आता तो मेगा लिलावात दिसणार आहे.



अंशुलने २०२२मध्ये हरियाणाकडून त्रिपुरा विरुद्ध प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले, तर आयपीएलमध्ये गतवर्षी त्याने मुंबई इंडियन्ससाठी पहिला सामना खेळला. त्याने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध पदार्पण केले आणि स्टार भारतीय फलंदाज मयंक अग्रवालची विकेट घेतली होती.

रणजी चषक स्पर्धेत एका डावात १० विकेट्स घेणारा तो केवळ तिसरा गोलंदाज ठरला आहे. १९५६-५७मध्ये प्रेमांग्सू चॅटर्जी यांनी, तर प्रदीप सुदरमन यांनी १९८५-८६मध्ये १० विकेट्स घेण्याची करामत केली होती.

भारतात प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये एका डावात १० पैकी १० विकेट्स पटकावण्याचा मान सुभाष गुप्ते, अनिल कुंबळे आणि देबाशीष मोहंती यांनी पटकावला होता.

### तेजतर्रार मारा

अंशुल ताशी १४० किमी वेगाने गोलंदाजी करू शकतो. याच वेगाने गोलंदाजी करत राहणे ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे. त्याने यापूर्वी अंडर १९ स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. अंशुल हा दुलीप ट्रॉफी २०२४-२५दरम्यान चर्चेचा केंद्रबिंदू बनला होता, जिथे त्याने इंडिया सी कडून खेळताना एकाच डावात आठ विकेट घेतल्या होत्या.

# बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेपूर्वी भारताला धक्का

## केएल राहुल दुखापतग्रस्त

**पर्थ : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीतील पहिला कसोटी सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठी दोन्ही संघ तयारीला लागले आहेत. दरम्यान, भारतीय संघाचा स्टार फलंदाज केएल राहुलबाबत मोठी बातमी समोर येत आहे. राहुलला शुक्रवारी सकाळी पर्थमधील डब्ल्यूएसीए येथे सामन्याच्या सिम्युलेशन सत्रादरम्यान दुखापत झाली आहे.

राहुलने यशस्वी जयस्वाल सोबत सलामी फलंदाजीची सुरुवात केली, कारण भारताने कर्णधार रोहित शर्माच्या जागी आपली संभाव्य योजना आखली आहे. तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या पर्थ कसोटीला मुकण्याची शक्यता आहे.

पत्रकारांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुलच्या उजव्या हाताच्या कोपराला शॉर्ट डिलिव्हरीवर मार लागला. फिजिओच्या काही मदतीनंतर त्याने फलंदाजी पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला, पण तरी राहुलने मैदानाबाहेर जाण्याचा निर्णय घेतला.

भारताचा ३-० असा पराभव होण्यापूर्वी बंगळुरूमधील पहिल्या कसोटीनंतर राहुलला वगळण्यात आले. त्यानंतर मेलबर्न येथे ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध नुकत्याच झालेल्या दुसऱ्या अनौपचारिक सामन्यासाठी त्याची भारत अ संघात निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये त्याच्याकडून समाधानकारक कामगिरी पाहायला मिळाली नाही.



राहुलच्या दुखापतीबाबत त्याने किंवा बीसीसीआने अद्याप कोणतीही माहिती दिली नसली तरी मीडिया रिपोर्ट्समध्ये मोठा खुलासा झाला आहे. आता अशा स्थितीत सरफराज खाननंतर केएल राहुलला दुखपत झाल्याने भारतीय संघाची डोकेदुखी वाढली आहे.

# एकाच सामन्यात दोन फलंदाजांची त्रिशतके

## रणजी स्पर्धेत कश्यप, स्नेहलने रचला इतिहास

**पोर्वोरिम : वृत्तसंस्था**

क्रिकेट सामन्यांमध्ये एखादा फलंदाज त्रिशतक झळकावताना पाहण्याचा क्षण क्वचित कधीतरी येतो, पण रणजी ट्रॉफी सामन्यात गोव्याच्या एक नव्हे; तर दोन्ही फलंदाजांनी एकाच डावात त्रिशतक झळकावली आहेत. रणजी ट्रॉफी स्पर्धेत गोवा संघाने प्लेट गट सामन्यात अरुणाचल प्रदेशविरुद्ध खेळताना हा अनोखा विक्रम केला.

अरुणाचल प्रदेश वि. गोवा या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी फलंदाज कश्यप बकळे आणि स्नेहल कौठणकर या फलंदाजांनी त्रिशतके करत क्रिकेट जगतात खळबळ उडवून दिली. पोर्वोरिम येथे खेळल्या जात असलेल्या या सामन्यात पहिल्या दिवशी गोवा संघाने अरुणाचल प्रदेशला पहिल्या डावात अवघ्या ८४ धावांवर सर्वबाद केले. प्रत्युत्तरात गोव्याने कश्यप आणि स्नेहल यांच्या त्रिशतकांच्या जोरावर स्कोअरबोर्डवर ७००हून अधिक धावा जोडल्या.



गोवा संघाने पहिल्या डावात २ बाद ७२७ धावा करत डाव घोषित केला. यादरम्यान कश्यप २६९ चेंडूंत ३९ चौकार व दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३०० धावा, तर स्नेहल २१५ चेंडूंत ४५ चौकार व चार षटकारांनिशी नाबाद ३१४ धावा करून माघारी परतला. अशा प्रकारे दोन्ही फलंदाजांनी रणजी ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या भागीदारीचा विक्रम केला. याशिवाय प्रभुदेसाईने ७३ धावांचे योगदान दिले.

### सर्वात मोठी भागिदारी


रणजीमधील यापूर्वी सर्वात मोठ्या भागीदारीचा विक्रम महाराष्ट्राच्या स्वप्नील गुगळे आणि अंकित बावणे यांच्या नावावर होता. या दोघांनी २०१६मध्ये दिल्लीविरुद्धच्या सामन्यात तिसऱ्या विकेटसाठी ५९४ धावांची भागीदारी केली होती. कश्यप आणि स्नेहल यांनी अरुणाचल प्रदेशविरुद्धच्या प्लेट ग्रुप सामन्यात तिसऱ्या विकेटसाठी नाबाद ६०६ धावांची भागीदारी केली. अशा प्रकारे रणजी करंडक स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी भागीदारी म्हणून रेकॉर्ड बुकमध्ये नोंद झाली.

# ऑस्ट्रेलियाने उडवला पाकिस्तानचा धुव्वा

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया संघाने गाबाच्या ऐतिहासिक मैदानावर पाकिस्तानचा धुव्वा उडवला आहे. तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानला २९ धावांनी लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. पावसामुळे सात षटकांच्या झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने ९३ धावा करत पाकिस्तानच्या गोलंदाजांची धुलाई केली, तर नंतर कांगारू गोलंदाजांनी पाकिस्तानच्या फलंदाजांचा धुव्वा उडवत दणदणीत विजय मिळवला.

पाकिस्तानी संघाने एकदिवसीय मालिका २-१ने जिंकली असताना तीन सामन्यांच्या



टी-२० मालिकेत त्यांची सुरुवात अतिशय लाजिरवाणी झाली. या मालिकेतील पहिला सामना ब्रिस्बेनच्या गाबा मैदानावर खेळला गेला, जो पावसामुळे विस्कळीत झाला. त्यामुळे सामना खूप उशिरा सुरू झाला आणि तो ७-७ षटकांचा खेळवण्यात आला. या सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना सात षटकांत चार गडी गमावून ९३ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी संघ सात षटकांत नऊ गडी गमावून ६४ धावाच करू शकला आणि त्यांना २९ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले.

पाकिस्तानचा नवा कर्णधार मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखाली ही संघ टी-२०मध्ये फार काही चांगली कामगिरी करू शकला नाही. या सामन्यात पाकिस्तानी संघ ९४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरला, तेव्हा अवघ्या १६ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. कर्णधार मोहम्मद रिझवान खातेही उघडू शकला नाही, तर संघाचा सर्वात अनुभवी खेळाडू बाबर आझम तीन धावा करत बाद झाला.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाचे झेवियर बार्टलेट आणि नॅथन एलिस यांची भेदक गोलंदाजी पहायला मिळाली, ज्यात दोघांनी प्रत्येकी तीन विकेट घेतले. याशिवाय ॲडम झम्पाने दोन, तर स्पेन्सर जॉन्सनलाही एक विकेट घेण्यात यश आले.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजीत मॅक्सवेलने कहर केला. त्याने १९ चेंडूत तीन षटकार आणि पाच चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या. त्याच्या जोडीला मार्कस स्टॉयनिसे सात चेंडूत एक षटकार आणि दोन चौकाराच्या मदतीने २१ धावा केल्या होत्या.

# वरुण चक्रवर्तीने टाकले अश्विनला मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात भारतीय फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती महाग ठरला. त्याने चार षटकात ५४ धावा दिल्या, पण दोन विकेटही घेतल्या. यासोबतच त्याने रविचंद्रन अश्विनला मागे टाकून एक मोठा पराक्रम आपल्या नावावर केला आहे.

याआधी दुसऱ्या टी-२०मध्ये चक्रवर्तीने पाच विकेट घेतल्या होत्या. चालू मालिकेतील केवळ तीन सामन्यांत त्याने १० विकेट्स घेतल्या आहेत. त्यामुळे तो द्विपक्षीय टी-२० मालिकेत सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम अश्विन आणि रवी बिश्नोई यांच्या नावावर संयुक्तपणे होता. यासह द्विपक्षीय टी-२० मालिकेत १० किंवा त्याहून अधिक बळी घेणारा वरुण पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे.

अश्विनने २०१६मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेत ३.१८च्या प्रभावी इकॉनॉमीसह तीन सामन्यांत नऊ विकेट घेतल्या होत्या, तर गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेत बिश्नोईने ८.२०च्या इकॉनॉमीसह पाच सामन्यात नऊ विकेट घेत अश्विनच्या विक्रमाची बरोबरी केली होती.

# न्यूझीलंडच्या साऊदीकडून कसोटी निवृत्तीची घोषणा

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

चालू वर्ष (२०२४) संपण्याच्या मार्गावर आहे. या वर्षी अनेक क्रिकेटपटूंनी क्रिकेटला अलविदा केला. आता या यादीत आणखी एका नावाची भर पडणार आहे. हा खेळाडू असा गोलंदाज आहे, ज्याच्या नावावर कसोटीत वीरेंद्र सेहवाग आणि रोहित शर्मापेक्षा जास्त षटकार आहेत. तो खेळाडू न्यूझीलंडचा दिग्गज गोलंदाज टिम साऊदी आहे.



न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजाने निवृत्तीबाबत मोठी घोषणा केली आहे. इंग्लंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या घरच्या मालिकेनंतर टीम साऊदी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने ही माहिती दिली, मात्र पुढील जूनमध्ये न्यूझीलंड वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) फायनलसाठी पात्र ठरल्यास साऊदी निवडीसाठी उपलब्ध असेल.

# पुनरागमनानंतर मोहम्मद शमी भावूक

**इंदूर : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी जवळपास वर्षभरानंतर स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये परतला आहे. या अनुभवी वेगवान गोलंदाजाने गुरुवारी झालेल्या रणजी सामन्यात चार बळी घेत दुखापतीतून शानदार पुनरागमन केले. शमीने आपल्या दमदार पुनरागमनाचे श्रेय चाहत्यांना दिले आहे.

एका वर्षाहून अधिक काळानंतर लाल चेंडूचा पहिला सामना खेळणाऱ्या शमीने इंदूर येथील होळकर क्रिकेट स्टेडियमवर मध्य प्रदेशच्या पहिल्या डावात चार बळी घेतले. पहिल्या डावात चमकदार कामगिरी करणाऱ्या शमीने पोस्ट करत लिहिले की, अखेर प्रतीक्षा संपली. ३६० दिवसांनंतर मी आणखी मजबूत आणि अधिक भुकेने मैदानावर परतलो आहे. रणजीमध्ये बंगालच्या चार विकेट ही फक्त



सुरुवात आहे. प्रत्येक चेंडू, प्रत्येक विकेट तुम्हाला समर्पित आहे, माझे अद्भूत चाहते, तुमचे प्रेम माझ्या उत्कटतेला उत्तेजन देते! हा हंगाम अविस्मरणीय बनेल!

गेल्या वर्षी १९ नोव्हेंबर रोजी विश्वचषक २०२३ च्या फायनलपासून स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर असलेल्या शमीच्या घोट्याला दुखापत झाली होती, ज्यासाठी त्याला ऑपरेशन करावे लागले होते. दुखापतीतून सावरल्यानंतर जवळपास वर्षभरात प्रथमच स्पर्धात्मक सामना खेळणाऱ्या शमीला रणजी ट्रॉफीच्या सामन्यात मध्य प्रदेश विरुद्ध मैदानात उतरला. यात त्याने १९ षटकांत ५४ धावांत चार विकेट्स घेतल्या. त्यामुळे बंगालने पहिल्या डावात आघाडी घेतली.

# रमणदीप सिंगचे झंझावाती पदार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील खेळल्या गेलेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात रमणदीप सिंगने टीम इंडियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. हे त्याचे आंतरराष्ट्रीय पदार्पणही होते. रमणदीपसाठी हा सामना संस्मरणीय होता. त्याने फलंदाजीला आल्यानंतर हा सामना आणखी संस्मरणीय बनवला आणि पहिल्याच चेंडूवर अशी कामगिरी केली, ज्याचा विचार करायलाही फलंदाज घाबरतात.

खरेतर आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिल्या चेंडूवर षटकार ठोकणारा रमणदीप सिंग हा भारताचा दुसरा फलंदाज ठरला. त्याच्या आधी फक्त सूर्यकुमार यादवच भारतासाठी अशी कामगिरी करू शकला आहे. २००१नंतरच्या आकडेवारीनुसार सूर्या आणि रमणदीप हे एकमेव भारतीय आहेत, ज्यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात षटकाराने केली. या सामन्यात रमणदीपला सहा चेंडू खेळण्याची संधी मिळाली आणि तो १५ धावा करून धावबाद झाला. षटकार मारण्याबरोबरच त्याने आपल्या डावात एक चौकारही मारला.

# विराट कोहलीमध्ये खराब फॉर्म सुधारून यश संपादन करण्याची क्षमता

## रवी शास्त्रींचे वक्तव्य



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीबाबत विराट कोहलीबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे. ऑस्ट्रेलियातील आगामी पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत आपला खराब फॉर्म सुधारण्याची आणि यश संपादन करण्याची क्षमता स्टार फलंदाज विराट कोहलीत आहे, असा विश्वास शास्त्री यांनी व्यक्त केला.

विराट कोहली गेल्या काही महिन्यांपासून सर्व फॉरमॅटमध्ये वाईट टप्प्यातून जात आहे. ३६ वर्षीय विराटने या वर्षाच्या सुरुवातीपासून बांगलादेश आणि न्यूझीलंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांमध्ये फक्त एक अर्धशतक झळकावले आहे. त्याची सरासरी फक्त २१.३३ आहे, पण शास्त्रींनी ऑस्ट्रेलियाला इशारा देत विराट त्या देशात खेळेल, जिथे त्याला फलंदाजी आणि धावा करायला आवडते, असे म्हटले आहे.

विराटने ऑस्ट्रेलियात चमकदार कामगिरी केली असल्याने शास्त्रींनी मोठे विधान केले आहे. त्यांचे आकडे पुरावे म्हणून आहेत. शास्त्री यांनी 'आयसीसी रिव्ह्यू'मध्ये म्हटले आहे की, राजा (विराट) आता जिथे तो चांगली कामगिरी करतो तिथे खेळेल. मी त्यांना एवढेच सांगेन.

# शिखर धवन एनपीएलमध्ये खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज क्रिकेटपटू शिखर धवन याने या वर्षी ऑगस्ट महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. त्यानंतर तो लेजेंड्स लीग क्रिकेटमध्ये खेळताना दिसला होता. आता धवन नेपाळ प्रीमियर लीगमध्येही भाग घेणार आहे. एनपीएल २०२४मध्ये तो कर्णाली याक्सकडून खेळताना दिसेल. नेपाळ प्रीमियर लीगचा हा पहिलाच हंगाम असेल हे विशेष.



एनपीएलमध्ये एकूण आठ संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा ३० नोव्हेंबरपासून सुरू होईल आणि २१ डिसेंबरपर्यंत चालेल. लीगमध्ये एकूण ३२ सामने खेळले जातील. स्पर्धेचे स्वरूप इंडियन प्रीमियर लीगप्रमाणे असेल, जेथे प्लेऑफमध्ये एक एलिमिनेटर, दोन क्वालिफायर आणि नंतर अंतिम सामना खेळला जाईल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com